CMYK

# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०२ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३२४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# इराणकडून डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा फतवा ?

तेहरान/वृत्तसंस्था: एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येसाठी आता इराण ने थेट फतवा जारी केला आहे. इराण आता त्यांच्या देशाचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह खामेनींच्या मृत्यूचा बदला घेणार असल्याचं बोललं जात आहे.

खामेनींच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी इराणमध्ये आता लाल ध्वज देखील फडकवण्यात आला आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या हत्तेसाठी फतवा जारी झाला असल्याने आता इराण प्रचंड आक्रमक धोरण स्वीकारतोय, असं बोललं जात आहे. दरम्यान, इस्रायल आणि अमेरीकेने केलेल्या संयुक्तीक हल्ल्यामध्ये शनिवारी (२८ फेब्रुवारी) इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांचा मृत्यू झाला आहे. ही घटना इराणला हादरवून टाकरणारी ठरली आहे. इस्लामिक रिपब्लिकमधील धर्मगुरु राजवटीचं या घटनेमुळे मोठं नुकसान झालं आहे. त्यांनी गेली तीन दशकं इराणच्या राजकीय गादीवर वर्चस्व गाजवलं होतं. त्यांनी तयार केलेली व्यवस्था नेस्तनाबूत करणं अशक्य असं मानलं जात असे. खामेनींच्या जागी आता त्यांचे उत्तराधिकारी त्यांचे पुत्र मोज्तबा खामेनी यांची निवड करण्या येणार आहे अशीही माहिती समोर येत आहे, मात्र यावर आणखी तरी शिक्कामोर्तब झालेलं नाही.

खामेनींच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी आता इराणच्या पवित्र जामकरन मशिदीवर अधिकाऱ्यांनी लाल ध्वज फडकवला आहे.



**आतापर्यंत २०० लोकांचा मृत्यू**

दरम्यान, आतापर्यंत इस्रायल आणि अमेरिकेने केलेल्या हल्ल्यानंतर इराणमध्ये तब्बल २०० पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर ७०० पेक्षा जास्त लोक जखमी आहेत. या हल्ल्यांमध्ये इराणमधील २४ प्रांतांना लक्ष्य केले गेले आहे. आतापर्यंतचे हे सर्वात मोठे हवाई हल्ले आहेत, असा दावा इस्रायलने माध्यमांसमोर केला आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांचा नवा दावा**

खामेनींच्या मृत्यूनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली होती. या पोस्टमध्ये 'आम्ही इतिहासातील सर्वात दुष्ट माणसाला मारले आहे, त्यामुळे आता इराणच्या लष्करातील अनेक सदस्य, सुरक्षा कर्मचारी आणि पोलिस दल यांची आमच्यासोबत युद्ध करण्याची तयारी नाही, ते सरेंडर होण्यासाठी जवळपास तयार आहेत', असाही दावा ट्रम्प यांनी केला आहे.


## डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येचा फतवा



इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्या मृत्यूनंतर आता इराण चांगलाच खवळला आहे. इराणने पहिल्यांदाच अरब देश ओमानच्या बंदरावर ड्रोन हल्ले केले. इतकंच काय तर, इराणने डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येसाठी फतवा देखील जारी केला आहे. आता अमेरिका-इस्रायलने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, अशा शब्दात इराणने संताप व्यक्त केला आहे.

## इस्रायलच्या मोसादला कसे कळाले खामेनींचे लोकेशन ?

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांचा इस्रायलच्या हल्ल्यात मृत्यू झाला. खामेनी हे इराणमधील त्यांच्या राजवाड्यात त्यांच्या जवळच्या सल्लागारांसोबत बैठक घेत होते. पण या बैठकीची माहिती इस्रायली गुप्तचर संस्था मोसदला कोणीतरी दिली होती. मोसादला किती वाजता बैठक होणार आहे आणि तेथे कोण उपस्थित राहणार आहे याची माहिती होती. या माहितीमुळेच इस्रायलने सकाळी तात्काळ हल्ला करण्याचा निर्णय घेतला.



मुळात इस्रायलने सुरुवातीला रात्री हल्ला करण्याची योजना आखली होती, परंतु सर्वोच्च नेत्याबद्दल माहिती मिळताच, तात्काळ हल्ला करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या मृत्यूनंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथवर एका पोस्टमध्ये त्यांना इतिहासातील सर्वात वाईट लोकांपैकी एक खामेनी मरण पावले असे लिहिले. इस्रायलच्या चॅनल १२ ने वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने वृत्त दिले की, खामेनी यांचा मृतदेह राष्ट्रपती निवासस्थानी ढिगाऱ्यात सापडले.

एका इस्रायली लष्करी अधिकाऱ्याने सांगितले की हा हल्ला अनेक महिन्यांपासून नियोजित असलेल्या ऑपरेशनल योजनेवर आधारित होता, इस्रायली अधिकाऱ्याने पुढे म्हटले की तीन ठिकाणी इराणी सरकारी बैठका होत होत्या आणि तिन्ही ठिकाणी हल्ला करण्यात आला, ज्यामध्ये अनेक वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना लक्ष्य केले गेले.

इराणचे सर्वोच्च नेते बराच काळ भूमिगत राहत होते. इस्रायल अमेरिकेविरोधात इराण यांच्यात सुरू झाल्यानंतर सर्वोच्च नेत्याने निवासस्थानी बैठक घेणे हे मोसादच्या पथ्यावर पडले. म्हणूनच, इस्रायलला त्यांच्या स्थानाची माहिती मिळताच, निवासस्थानावर ३०-४० क्षेपणास्त्रांनी हल्ला करण्यात आला, ज्यामुळे संपूर्ण राष्ट्रपती निवासस्थान उद्ध्वस्त झाला. ब्रिटिश माध्यमांनी गुप्तचर संस्थांच्या हवाल्याने वृत्त दिले की किमान ४० वरिष्ठ नेते आणि अधिकारी मारले गेले. यामध्ये इराणचे संरक्षण मंत्री अमीर नासिरजादेह, क्रांतिकारी गार्ड्स कमांडर मोहम्मद पाकपूर, राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली शामखानी आणि सर्वोच्च नेत्याचे लष्करी सचिव मोहम्मद शिराजी यांचा समावेश होता.

## मंत्री एस जयशंकर यांची इराण आणि इस्रायलच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा; दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याचं आवाहन



नवी दिल्ली/वृत्तसंस्था: इस्रायल आणि अमेरिकेच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचा दावा इस्रायलने केला. त्यामुळे इराणने संतप्त होत अमेरिका आणि इस्रायलवर खूप मोठा हल्ला करण्याचा इशारा दिला आहे. इराणच्या इशाऱ्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही पुन्हा धमकी देत इराणवर अतिशय शक्तिशाली हल्ला करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे आता इस्रायल-अमेरिका आणि इराणमधील या युद्धाचा आणखी भडका उडण्याची शक्यता आहे.

अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील या संघर्षावर भारताने प्रतिक्रिया जारी करत शांतता राखण्याचं आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचं व संवाद व राजनैतिकतेद्वारे तणाव सोडवण्याचं आवाहन केलं आहे. तसेच अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील वाढत्या संघर्षाबाबत भारताने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी इस्रायल आणि इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांशी फोनद्वारे संवाद साधला असन दोन्ही देशाला संवाद आणि राजनैतिकतेचं आवाहन केलं आहे. याबाबतची माहिती परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत दिली. मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं की, इस्रायलच्या परराष्ट्र मंत्र्यांशी संवाद साधला. तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि राजनैतिकचं आवाहन केलं.

## नागपूरच्या गनपावडर कारखान्यात स्फोट, १७ ठार



**तभा वृत्तसेवा**

**नागपूर, दि. ०१ मार्च :** महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरमधून होलिकोत्सवाच्या आदल्या दिवशी एक दुःखद बातमी आली आहे. नागपूर जिल्ह्यातील एसबीएल एनर्जी एक्सप्लोजिव्हज या गनपावडर तयार करणाऱ्या कारखान्यात स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आणि १८ जण जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केले.

नागपूर दुर्घटनेप्रकरणी नियमानुसार पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी मधून प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना दोन लाख रुपये सानुग्रह मदत तसेच जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्यात येईल, अशी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून केली आहे. तसेच नागपूर जिल्ह्यातील दुर्घटनेप्रकरणी नियमानुसार मृतांच्या वारसांना पाच लाख रुपये मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स पोस्ट करून केली आहे. कंपनीकडूनही मृतांच्या वारसांना आणि जखमींना मदत दिली जाणार आहे.


नागपूर जिल्ह्यातील राऊळगाव येथे एसबीएल एनर्जी एक्सप्लोजिव्हज या गनपावडर तयार करणाऱ्या कारखान्यात स्फोट झाला. खाणकाम आणि औद्योगिक स्फोटके बनवणाऱ्या कारखान्यात स्फोट झाला. घटना सकाळी सात ते सव्वासातच्या दरम्यान घडली. खाणकामासाठी तसेच विविध औद्योगिक कामासाठी कारखान्यात गनपावडरची निर्मिती सुरू होती. हे काम सुरू असताना दुर्घटना झाली. माहिती मिळताच जिल्हाधिकारी विपिन इटनकर आणि एसपी पोदार घटनास्थळी पोहोचले, त्यांनी मदतकार्याचा आढावा घेतला.

## रंग-पिचकाऱ्यांच्या किंमतीत सरासरी पाच टक्के वाढ, तरीही खरेदीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**रायगड, दि. ०१ मार्च :** अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात धुलिवंदनाच्या पार्श्र्वभूमीवर बाजारपेठा रंगांनी न्हाऊन निघाल्या आहेत. होळीनंतर दुसऱ्या दिवशी साजऱ्या होणाऱ्या धुलिवंदन सणासाठी लागणारे पर्यावरणपूरक रंग आणि विविध आकारांच्या रंगीबेरंगी पिचकाऱ्या बाजारात मोठ्या प्रमाणात दाखल झाल्या आहेत. मात्र यंदा रंग व पिचकाऱ्यांच्या किंमतीत सरासरी पाच टक्क्यांची वाढ झाल्याने ग्राहकांना किंचित अधिक पैसे मोजावे लागत आहेत.

यंदा होळी सोमवारी २ मार्च रोजी असून त्यानंतर मंगळवारी धुलिवंदन साजरे केले जाणार आहे. ग्रामीण भागासह



शहरी भागातही रंगांची उधळण करण्याची परंपरा उत्साहात पाळली जाते. त्यामुळे बाजारात साध्या पिचकाऱ्यांपासून बंदूक प्रकार, टँकर पिचकाऱ्या तसेच लहान मुलांसाठी आकर्षक डिझाइन उपलब्ध झाली आहेत. विशेष म्हणजे छोटा भीम, बेन १० आणि बार्बी यांच्या चित्रांसह पिचकाऱ्यांना मोठी मागणी आहे.

पिचकाऱ्यांच्या किंमती १० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत आहेत. काही ठिकाणी दर स्थिर असले तरी अनेक ठिकाणी ५ ते १० टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. कच्च्या मालाच्या वाढलेल्या किंमतीमुळे दरवाढ अपरिहार्य ठरल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

महागाईची झळ बसत असली तरी सणाचा उत्साह कमी झालेला नाही. अलिबागसह जिल्ह्यातील विविध बाजारपेठांत खरेदीला सुरुवात झाली असून सुमारे २५ टक्के खरेदी पूर्ण झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. धुलिवंदनच्या आदल्या दोन दिवसांत ग्राहकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


## २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका अधांतरी

### सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी जुलैमध्ये

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०१ मार्च :** आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडलेल्या राज्यातील २० जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका पुढील आदेश होईपर्यंत जाहीर करू नये, असे सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे. या याचिकेवरील पुढील सुनावणी २१ जुलै रोजी होणार असल्याने निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायलयाने दिला तरी या सर्व निवडणुका पावसाळ्यानंतरच ऑक्टोबर वा नोव्हेंबरमध्ये होण्याची अधिक शक्यता आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या पाच वर्षापासून रखडलेल्या निवडणूका मार्गी लावताना ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळणाऱ्या महापालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगास दिले होते. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने ४२ नगरपंचायती, २४६ नगरपालिकांसह २९ महापालिका आणि १२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यानंतर आता विदर्भ



आणि मराठवाड्यातील उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न सुरू केले होते. त्यानुसार २३ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान सरकारने शिल्लक राहिलेल्या २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका होऊ देण्याची न्यायालयास विनंती केली.

मात्र स्थानिक स्वराज्य संस्थामंधील ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाल्याचा मुद्दा निकाली लागेपर्यंत जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेऊ नका, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वीच दिले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षण उल्लंघनाचा मुद्दा निकाली काढण्यासाठी सरन्यायाधीश सुर्य कांत यांच्या अध्यक्षतेखाली न्या.जॉयमाल्या बागची, न्या. विपूल पांचोली अशा तीन न्यायाधिशांचे खंडपीठ गठीत केले आहे. या खंडपीठासमोर आता २१ आणि २२ जुलै रोजी ५० टक्के आरक्षण मर्यादेच्या उल्लंघनाबाबत सुनावणी घेण्याचे न्यायालयाने जाहीर केले आहे. त्यामुळे ही सुनावणी पूर्ण होऊन निकाल लागेपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होऊ शकणार नाहीत. जुलै, आगस्ट दरम्यान याचा निकाल लागला तरी पावसांमुळे या निवडणुका ऑक्टोबर- नोव्हेंबर पर्यंत होऊ शकणार नाहीत अशी माहिती आयोगातील सूत्रांनी दिली.

## राज्यभरातील सर्व कार्यालयांचे ३० दिवसांत PoSH ऑडिट

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०१ मार्च :** राज्यभरातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि खासगी कार्यालयांमध्ये 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' म्हणजेच PoSH Act ची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी ३० दिवसांत विशेष ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

राज्यातील प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती कार्यरत आहे का, तिची रचना व कामकाज योग्य प्रकारे सुरू आहे का, याची खात्री करण्यासाठी हे 'झेडक ऑडिट' राबविण्यात येणार आहे. समिती अस्तित्वात नसल्यास तात्काळ स्थापना करावी, अन्यथा संबंधितांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नुसार प्रत्येक शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळ, मंडळ, स्वायत्त संस्था तसेच खासगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार निवारण समिती कार्यरत असणे आवश्यक आहे.राज्य महिला आयोगाकडे येणाऱ्या तक्रारी, विविध अहवाल आणि राज्यभरातील दौऱ्यांदरम्यान अनेक ठिकाणी गंभीर त्रुटी आढळून आल्याचे चाकणकर यांनी नमूद केले. काही कार्यालयांत समितीच स्थापन नाही, काही ठिकाणी ती केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात कार्यरत नाही. याशिवाय समिती सदस्यांना प्रशिक्षणाचा अभाव, वार्षिक अहवाल न सादर करणे आणि दर्शनी भागात माहिती फलक नसणे अशा बाबीही निदर्शनास आल्या आहेत.

## थोडक्यात...

### बंजारा आरक्षणासाठी समिती

### 'ॲपल पे' भारतात लाँच होणार

नवी दिल्ली : जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी -ङ्क्षिश खपल. भारतातील डिजिटल पेमेंट क्षेत्रात मोठी झेप घेण्याच्या तयारीत आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर 'ॲपल पे' (-ङ्क्षिश झ्रू) ही सेवा भारतात लाँच होण्याची शक्यता असून, ब्लूमबर्गच्या ताज्या अहवालानुसार जून-जुलै २०२६ पर्यंत ती अधिकृतपणे सुरू होऊ शकते. भारतातील आयफोन वापरकर्त्यांसाठी ही मोठी बातमी मानली जात आहे. सध्या भारतातील डिजिटल पेमेंट बाजारात गुगल-पे, फोन-पे आणि पेटीएम यांसारख्या ॲप्सचं वर्चस्व आहे. मात्र 'ॲपल पे ' आयफोन आणि ॲपल वॉच वापरकर्त्यांसाठी अधिक सुरक्षित आणि गोपनीय पर्याय ठरू शकतो.

### खामेनीच्या मृत्यूबद्दल संताप

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, शिया समुदायातील लोकांनी अमेरिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी केली आहे. खामेनेई यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ लोक रस्त्यावर उतरले असून त्यांनी कडक विरोध दर्शविला आहे. या वेळी आंदोलकांकडून अमेरिकेविरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात येत आहे. हजारो लोकांनी इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या मृत्यूविरोधात रोष व्यक्त केला आहे. खामेनी यांच्या मृत्यूनंतर जम्मू-काश्मीरमधील लाल चौक येथे मोठी गर्दी जमली आहे. लाल चौक परिसरात पुरुष आणि युवक अली खामेनी यांचे छायाचित्र हातात घेऊन दिसत आहेत.

### गाठी ऐवजी गर्भाशयच काढले

पुणे: पुण्यातील मांजरी परिसरातील एका खासगी रुग्णालयातून वैद्यकीय क्षेत्राला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. गर्भाशयातील साधी गाठ काढण्यासाठी शस्त्रक्रिया करायला गेलेल्या एका ३५ वर्षीय महिलेचे डॉक्टरांनी तिची कोणतीही संमती नसताना थेट गर्भाशयच काढून टाकले. याप्रकरणी मांजरी पोलिसांनी साई केअर हॉस्पिटलमधील चार डॉक्टरांसह पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

### अभिनेता विष्णू मंचू यांच्या घराजवळ क्षेपणास्त्रांचे आवाज

**दुबई :** अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे मध्यपूर्वेत तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हल्ले-प्रतिहल्ल्यांमुळे अनेक देश सतर्क झाले असून या घडामोडींचा परिणाम दुबईवरही जाणवत आहे. काही प्रवासी दुबई विमानतळावर अडकले असल्याची माहिती समोर येत आहे. अशातच दुबईत असलेल्या तेलुगू चित्रपटसृष्टीतील स्टार विष्णू मंचू या भारतीय अभिनेत्याने सोशल मीडियावर धक्कादायक व्हिडिओ शेअर केला आहे. आपल्या घराजवळून आकाशात क्षेपणास्त्र झेपावत असल्याचा दावा त्याने केला आहे. स्फोटांच्या तीव्र आवाजामुळे संपूर्ण घर हादरल्याचे देखील त्याने सांगितले.

### एलपीजी सिलेंडर महागले

**मुंबई:** देशातील सर्व तेल विपणन कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढवल्या आहेत. गॅस सिलिंडरच्या किमती २८ रुपयांनी वाढवून ३१ रुपये करण्यात आल्या आहेत, नवीन किमती देखील रविवारपासून म्हणजेच १ मार्चपासून लागू झाल्या आहेत. तथापि, ही वाढ फक्त १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरवर झाली आहे. घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. दिल्लीत १९ किलोच्या एलपीजी सिलिंडरची किंमत १७४०.५० रुपयांवरून १७६८.५० रुपये झाली आहे.

### पाक दूतावासावर हल्ल्याचा प्रयत्न

इराण : मध्य पूर्वेत युद्धाचा भडका उडाल्याने संपूर्ण जग सुन्न झालं आहे. अमेरिका आणि इस्रायल या दोन्ही देशांनी संयुक्तपणे इराणवर अचानक हल्ला केला. इराण आपल्यावर हल्ला करेल या भीतीने इस्रायलने अमेरिकेसोबत आधी हल्ला केला, असं स्पष्टीकरण इस्रायलकडून देण्यात आलं आहे. इराणच्या अनेक शहरांमध्ये क्षेपणास्त्र डागली गेली. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनी यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील अनेकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याविरोधात पाकिस्तानात संतापाची लाट पसरली आहे. त्यामुळे पाकिस्तानातील एका गटाने कराचीतील अमेरिकेच्या दूतावासावर हल्ल्याचा मोठा प्रयत्न केला आहे. या घटनेचे व्हिडीओ समोर आले आहेत.

## नेटफ्लिक्सने 'हॅलो बच्चो'चा ट्रेलर रिलीज केला

**लातूर:** हॅलो बच्चो-हा फक्त वर्गात उच्चारला जाणारा शब्द नाही, तर नवीन विचार आणि प्रेरणेचे प्रतीक आहे. नेटफ्लिक्सने आपल्या नव्या सिरीजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. ही सिरीज शिक्षक अलख पांडे यांच्या खास प्रवासावर आधारित आहे, ज्यांचा प्रभाव केवळ वर्गापुरता मर्यादित राहिला नाही, तर भारतातील अनेक विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत आणि मनापर्यंत पोहोचला आहे. ६ मार्च रोजी प्रीमियर होणारी ही सिरीज अशा विद्यार्थ्यांची कथा सांगते ज्यांनी आपली स्वप्ने कधीही सोडली नाहीत. त्यांच्या शिक्षकांनी त्यांच्यावर विश्र्वास ठेवला आणि त्याच विश्र्वासामुळे त्यांना पुढे जाण्याची ताकद आणि धैर्य मिळाले.

## अजंता व्हॅली इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ०१ मार्च :** येथील अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालय येथील प्राध्यापक डॉ.प्रमोद अंबादासराव पवार हे होते.प्रमुख अतिथी म्हणून सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,गट शिक्षणाधिकारी सचिन शिंदे,पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक पंकज भुरे,बी.एन.पिंगाळकर,शाळेचे संस्थापक डॉ.दिनकर पिंगाळकर तसेच डॉ.स्वाती पिंगाळकर,शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी रोकडे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सीमा भामरे व सोनाली बागुल यांनी केले.प्रस्ताविक शाळेच्या संचालिका डॉ.स्वाती पिंगाळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन रामचंद्र लाड यांनी केले.

याप्रसंगी प्राध्यापक डॉ.प्रमोद पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.बदलत्या शिक्षण पद्धतीवर त्यांनी आपले विचार मांडले.आता यापुढे शिक्षणासोबतच अशा कलागुणांना गुण देण्यात येतील असे त्यांनी नमूद केले. लहान वयापासूनच व्यासपीठावर येऊन आपले कलागुण सादर करणे यामुळे भविष्यात मोठे कलावंत निर्माण होऊ शकतात.विद्यार्थ्यांनी निडर होऊन आपण प्रतिनिधित्व केले पाहिजे ज्यामुळे आपल्या सोबत काम करणारे देखील आपल्या पद्धतीने व्यवस्थित काम करू शकतात असे त्यांनी उदाहरण देऊन सांगितले.

स्नेहसंमेलनामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी भक्ती गीते, चित्रपट गीते,ऐतिहासिक प्रसंगावरती आधारित, देशभक्तीपर गीते,पोवाडे,मुली शिकवा समाज शिक्षित होईल याबद्दलची नाटिका तसेच पाणी वाचवा पाण्याचे व्यवस्थापन करा अशा जनजागृती विषयावर विद्यार्थ्यांनी आपली कला साजरी केली,छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनपटावर आधारित नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी पालक वर्ग तसेच परिसरातील नागरिकांची मोठी उपस्थिती हो ती.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका शितल काटोले, रुपाली गोल्हारे,पूजा दामधर,दिक्षा पवार,प्रियांका रोकडे, मयुरी पेनडोर तसेच नृत्य दिग्दर्शक समाधान व विठ्ठल यांनी परिश्रम घेतले.

## लव जिहादच्या विरोधात भव्य जन आक्रोश मोर्चा; लेकीसाठी समाज एकत्र



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ०१ मार्च :** पैठण येथे घडलेल्या एका तरुणीच्या अपहरणाच्या घटनेच्या पार्श्र्वभूमीवर पैठण शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने लव जिहाद, जबरदस्तीने धर्मांतर विरोधात शांततापूर्ण आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

या मोर्चाची सुरुवात खंडोबा मंदिर येथून करण्यात आली. मोर्चामध्ये हरिभक्त परायण महाराज, कीर्तनकार, प्रवचनकार, संत-महंत, विद्यार्थी, पैठण शहरातील नागरिक तसेच पैठण तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले.

मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. यावेळी वक्त्यांनी समाजातील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्र्न, पालकांनी घ्यावयाची काळजी, तसेच तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरज याबाबत मार्गदर्शन केले. वक्त्या हर्षदा ठाकूर यांनी तरुण पिढीमध्ये सामाजिक सजगता, कायद्याचे पालन आणि मुलींच्या सन्मानाचे रक्षण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सदर प्रकरणातील तरुणी सध्या पोलिसांच्या ताब्यात असून पोलिसांकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. सर्वांनी कायद्यावर पूर्ण विश्र्वास ठेवून तपास निष्पक्ष व वेगाने व्हावा, तसेच दोषींवर कडक कारवाई व्हावी अशी मागणी याप्रसंगी करण्यात आली.

**अपहृत मुलीची मुंबईतून ४८ तासांत सुटका**

पैठण येथील संत नगर परिसरातून विवाहाच्या उद्देशाने पळवून नेलेल्या मुलीचा शोध लावण्यात पैठण पोलिसांना अवघ्या ४८ तासांत यश आले आहे. याप्रकरणी मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून पीडित मुलीला सुरक्षितपणे तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास पीडित मुलीस आरोपी चिराग फारुकी आणि त्याच्या एका साथीदाराने संगनमत करून, विवाहाच्या किंवा अन्य अनैतिक कारणासाठी बळजबरीने पळवून नेले होते. या घटनेमुळे परिसरात तसेच नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती. याप्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२), १३८, ८७, ११५, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही कारवाई पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे, जनाबाई सांगळे, पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे, ऋषिकेश तळेकर, तसेच पोलीस अंमलदार राजेंद्र जिवडे, कल्याण ढाकणे, योगेश तरमाळे,विलास सुखदान, अंकुश शिंदे, कृष्णा दुबाले, संतोष तोडकर, राहुल बल्लाळ, संतोष खिळे आणि महिला अंमलदार रंजना सूर्यवंशी, सुजाता बराटे, कोमल कोतकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. घटनेचा पुढील अधिक तपास पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शखाली पोलीस उपनिरीक्षक ऋषिकेश तळेकर हे करत आहेत.

# किडनी प्रत्यारोपणा नंतर यशस्वी जीवन जगणाऱ्या व्यक्तींचा 'सन्मान' सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०१ मार्च :** जागतिक किडनी दिनाच्या औचित्याने झेडटीसीसी आणि मेडिकव्हर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने किडनी प्रत्यारोपणानंतर यशस्वी, सक्षम आणि प्रेरणादायी जीवन जगणाऱ्या व्यक्तींचा विशेष 'सन्मान' पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. समाजात किडनी प्रत्यारोपणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे तसेच प्रत्यारोपणानंतरही आयुष्य पूर्ण क्षमतेने जगता येते हा संदेश व्यापक स्तरावर पोहोचवणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

हा सोहळा एमजीएम कॅम्पस येथील रुक्मिणी ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आला. मराठवाड्यातील किडनी प्रत्यारोपणानंतर स्वावलंबी आणि सक्रिय जीवन जगणाऱ्या अडीचशेहून अधिक व्यक्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले. जवळपास पाचशे जणांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

प्रत्यारोपणानंतर नोकरी, व्यवसाय, शेती, समाजकार्य, व्यापार, राजकारण, शिक्षण तसेच गृहिणी म्हणून कुटुंबीय जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणादायी यशकथा उपस्थितांसाठी विशेष ठरल्या. त्यांच्या अनुभवांमुळे इतर रुग्णांना मानसिक बळ मिळण्यासोबतच अवयवदान व प्रत्यारोपण प्रक्रियेबाबत जनजागृतीस हातभार लागणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री संजय शिरसाट (पालक तथा सामाजिक न्याय मंत्री), डॉ भागवत कराड(मा. केंद्रीय राज्य अर्थ मंत्री) , डॉ दयानंद मोतीपवळे(वैद्यकीय सहायक संचालक), डॉ पारस मंडलेचा(आरोग्य अधिकारी, महानगर पालिका) डॉ मिलिंद वैष्णव (सचिव नढउउ )व मेडिकोवर हॉस्पिटल चे रिजनल डायरेक्टर श्री नीरज लाल, डॉ. सचिन सोनी किडनी विकार तज्ञ, डॉ. राहुल रुईकर किडनी विकार तज्ञ, मेडिकवर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ विशाल कुटे उपस्थित होते.

किडनी प्रत्यारोपणानंतरचे जीवनमान, आत्मविश्र्वास आणि समाजातील पुनर्स्थापना यांचा सकारात्मक संदेश देणारा हा सोहळा मराठवाड्यासाठी प्रेरणादायी ठरला.

## ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये 'आनंद नगरी' उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०१ मार्च :** तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये दि.२८ फेब्रुवारी रोजी यंदाचा 'आनंद नगरी' उपक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. शाळेच्या परिसरात आनंद, उत्सुकता आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या विविध वस्तू विक्रीसाठी शाळेत आणल्या. विद्यार्थ्यांनी ग्राहकांशी संवाद साधत विक्री कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. पालकांनीही या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद देत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचा परिसर गजबजून गेला. मुलांच्या कल्पकतेला आणि कष्टाला पालकांनी दिलेली दाद हीच या उपक्रमाची खरी कमाई ठरली. 'आनंद नगरी' या उपक्रमामागील उद्दिष्ट केवळ मनोरंजन नसून विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता, व्यवहारज्ञान, आत्मविश्र्वास आणि संवादकौशल्य विकसित करणे हे आहे. या माध्यमातून मुलांना प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव मिळाला तसेच शिकता शिकता कमवा ही संकल्पना प्रत्यक्षात अनुभवता आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सविता सतीश तोतला व शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## लासूर चा कांदा निघाला थेट दुबईला



**तभा वृत्तसेवा/ तुषार सराफ**

**लासूर स्टेशन, दि. ०१ मार्च :** मराठवाड्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या लासूर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समिती मधून शेतकऱ्यांचा कांदा थेट दुबई येथे निर्यात होण्याची ऐतिहासिक नोंद झाली आहे.

स्थानिक शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला दर्जेदार कांदा प्रथमच थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचल्याने परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

लासूर स्टेशन येथील दुर्वालक्ष्मी ट्रेडिंग कंपनीचे व्यापारी शुभम चंद्रकांत पवार यांनी खरेदी केलेला उच्च प्रतीचा कांदा निर्यातीसाठी निवडण्यात आला.

शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी बाजार समितीच्या आवारात निर्यातीसाठी सज्ज असलेल्या कंटेनरचे विधिवत पूजन करून तो दुबईकडे रवाना करण्यात आला.या प्रसंगी बाजार समितीचे सभापती शेषराव नाना जाधव, उपसभापती अनिल पाटील चव्हाण तसेच कृषी उपन्न बाजार समितीचे सचिव संतोष पवार व्यापारी चंद्रकांत पवार यांच्या हस्ते पूजन पार पडले.

यावेळी संचालक मनिष पाटील पोळ,प्रकाश मुथा,सुनील पाखरे,अशोक पाटील जगताप,भाऊसाहेब पाटील चिंधे,सुबोध मुथा,इंजिनिअर उदावंत तसेच व्यापारी,शेतकरी आणि हमाल-मापाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शेतकऱ्यांना दिलासा**

**शेषराव नाना जाधव,सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती,लासूर स्टेशन**

थेट निर्यातीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या कांद्याला अधिक चांगला दर मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाल्याने स्थानिक कृषी अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून उत्पादनाला स्थैर्य प्राप्त होण्यास मदत होणार आहे.दर्जेदार मालाची निवड, पॅकिंग आणि निर्यातीची प्रक्रिया बाजार समितीच्या माध्यमातून यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याने लासूर बाजार समितीची प्रतिष्ठा अधिक भक्कम झाली आहे.

**बाजार समितीची प्रतिष्ठा उंचावली**

**संतोष पवार सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती,लासूर स्टेशन**

भविष्यात फळे-भाज्यांची निर्यात वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. लासूर स्टेशन बाजार समितीतून दुबईला झालेली कांद्याची ही निर्यात मराठवाड्यासाठी अभिमानास्पद ठरली असून शेतकऱ्यांच्या प्रगतीचा हा नवा अध्याय मानला जात आहे.

## ४ मंडळ मुख्यालयात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे' आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद दि. ०१ मार्च :** महाराष्ट्र शासन निर्णयानुसार, ग्रामीण भागातील जनतेच्या महसूल आणि इतर प्रशासकीय अडचणी तातडीने सोडवण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १)' खुलताबाद तालुक्यातील ४ मुख्य मंडळ मुख्यालयांमध्ये आयोजित करण्यात येत आहे. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने या शिबिरांचे नियोजन करण्यात आले असून, प्रशासकीय यंत्रणा आता थेट जनतेच्या दारी पोहोचणार आहे.

शिबिराची ठळक वैशिष्ट्ये:

एकाच छताखाली सेवा: शिबिरामध्ये महसूल विभाग, भूमी अभिलेख, पंचायत समिती, कृषी विभाग आणि आरोग्य विभागाचे स्टॉल्स असतील.

प्रमाणपत्रांचे वितरण: विविध दाखले (उत्पन्न, जात, अधिवास), रेशन कार्ड दुरुस्ती आणि नवीन कार्डांचे वाटप करण्यात येईल.

महसूल प्रकरणांचा निकाल: सातबारा दुरुस्ती, वारस नोंद आणि फेरफार प्रकरणांवर त्वरित कार्यवाही केली जाईल.

योजनांची माहिती: राज्य व केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचे अर्ज स्वीकारले जातील.

खुलताबाद तालुक्यातील नियोजित मंडळ मुख्यालये:

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात तालुक्यातील खालील ४ मंडळांमध्ये हे शिबीर पार पडेल: मंडळ मुख्यालिय व तारखा यानुसार आहेत - वेरुळ दिनांक ७.३.२०२६, बाजारसावंगी १०.४.२०२६, सुलतानपूर १७.४.२०२६ व खुलताबाद येथील नगर परीषद सभागृह येथे दिनांक ८.५.२०२६ या प्रशासनाने निश्र्चित केलेल्या. तारखांनुसार नागरिकांनी उपस्थित राहावे.

जनतेने आपल्या वैयक्तिक किंवा सार्वजनिक तक्रारींचे अर्ज घेऊन या शिबिराचा लाभ घ्यावा. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणे आणि शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

प्रशासनाच्या वतीने खुलताबाद तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या संबंधित मंडळ मुख्यालयात उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार श्री. संतोष गुटटे यांनी केले आहे.

## आई महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ०१ मार्च :** जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सोयगाव येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या दशसूत्री उपक्रमांतर्गत विद्यार्थी आरोगक्षम घडविणे या उद्देशाने सोयगाव येथील समाज प्रबोधनकार विष्णू मापारी व आरोग्य दूत डिगंबर वाघ यांनी आई महोत्सवा निमित्ताने विद्यार्थ्यांच्या मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.याशिबिरामध्ये शेंदुर्णी येथील प्रसिद्ध दंततज्ञ डॉ.चैतन्य कासार व डॉ.पूजा कासार यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून विद्यार्थ्यांना दंत स्वच्छतेबाबत सखोल असे मार्गदर्शन केले.यावेळी सोयगाव येथील समाजसेवक संजय शहापूरकर,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रवींद्र काळे, उपाध्यक्ष मंगेश सोहनी,कृषी भूषण अरुण सोहनी,संतोष सोनवणे,पत्रकार कृष्णा पाटील,समाज प्रबोधनकार विष्णू मापारी,आरोग्य दूत दिगंबर वाघ,सोयगाव केंद्राच्या प्रमुख फिरोज तडवी यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी कृषी भूषण अरूण सोहनी यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आयोजकाकडून टूथपेस्ट व बिस्किटचे वाटप करण्यात आले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी आरोग्य दुत डिगाबर वाघ, शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,पदवीधर शिक्षिका सुरेखा चौधरी,पंकज रगडे,रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे,सविता पाटील,प्रतिभा कोळी,गणेश बावस्कर, अंकुश काळे,मंदा मस्के,पांडुरंग बारगजे,विवेक महाजन, अनिल देसाई,तानाजी चव्हाण,शुभम देसले,पुनम लाड यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगला बोरसे तर आभार पंकज रगडे यांनी मानले.

------------

जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सोयगाव येथील विद्यार्थ्यां व विद्यार्थिनी यांचे या मोफत दंत तपासणी शिबिराचे कौतुकास्पद असून शाळेतील सर्व शिक्षक बांधव यांचे मनापासून अभिनंदन असेच विविध उपक्रमाचे कार्यक्रम आपल्या या शाळेमध्ये घ्यावे असे मत विविध मान्यवरांनी मांडले.

**- रवींद्र काळे,**
**माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष**

# सर्व विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी भाषा-साहित्याचे शिक्षण घेणे आवश्यक : कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०१ मार्च :** उत्तम संवाद हीच व्यक्तीच्या यशाची गुरुकिल्ली असून तंत्रज्ञान आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनीही भाषेचे आणि साहित्याचे शिक्षण घेतले पाहिजे. प्रत्येक विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी भाषा आणि साहित्याचे शिक्षण घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अविनाश आवलगावकर यांनी केले.

साहित्य आणि समाज यांचा अतूट व जिव्हाळ्याचा संबंध असून समाजाच्या मनातील निराशा दूर करण्याचे सामर्थ्य साहित्यामध्ये आहे, असे प्रतिपादन रिद्धीपूर येथील पहिल्या मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी केले. ते एमजीएम विद्यापीठ येथे 'मराठी भाषा गौरव दिन' निमित्त आयोजित आईन्स्टाईन सभागृह येथील कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ होते. व्यासपीठावर कुलपती अंकुशराव कदम, माजी कुलगुरू डॉ.सुधीर गव्हाणे, सामाजिक शास्त्रे व मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, भारतीय व विदेशी भाषा संस्थेचे संचालक डॉ.के.पी.सिंह यांची उपस्थिती होती.

आपल्या प्रभावी भाषणात डॉ. आवलगावकर म्हणाले की, कथा, कादंबरी, नाटक वाचताना आपण केवळ व्यक्तिरेखा वाचत नसतो; तर त्या माध्यमातून समाजमानस, इतिहास, तत्त्वज्ञान आणि भूगोल यांचेही दर्शन घडते.

मराठी भाषेचा गौरव करताना त्यांनी तेराव्या शतकातील काव्यव्याख्येचा संदर्भ देत भारतीय चिंतनपरंपरेची श्रीमंती अधोरेखित केली. पाश्र्चात्य अभ्यासकांनी पुढे मांडलेली काव्य व्याख्या आपण शिकत असलो, तरी भारतीयांनी आपल्या वैचारिक संपदेचा पुरेसा प्रचार केला नाही, ही खंत त्यांनी व्यक्त केली. म्हणूनच पाश्र्चात्य साहित्यिकांचे विचार जगभर पोहोचले आणि विल्यम शेक्सपियर यांसारखे लेखक जागतिक स्तरावर गौरवले गेले. आपल्या येथे ज्ञानेश्र्वर, तुकाराम यांसारखे श्रेष्ठ संत-कवी असूनही त्यांचे साहित्य जागतिक पातळीवर अपेक्षेप्रमाणे पोहोचले नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. रेखा शेळके यांनी मराठीच्या विविध बोलीभाषांचे उदाहरणांसह विवेचन केले. मराठीची समृद्ध लेखनपरंपरा आणि बोलीभाषांचा साहित्य व कलाक्षेत्रावर होणारा प्रभाव त्यांनी स्पष्ट केला. अध्यक्षीय समारोपात डॉ. विलास सपकाळ यांनी मराठी भाषेची विविध रूपे आणि भाषा-तंत्रज्ञान यांचा परस्परसंबंध स्पष्ट करत मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यापीठात शिकविल्या जाणाऱ्या मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, संस्कृत, पाली, पर्शियन, अरेबिक, फ्रेंच, जर्मन, जापनीज आदी विदेशी भाषा आणि अनुवाद अभ्यासक्रमांविषयी माहिती दिली.

कार्यक्रमात निमंत्रित कवींचे कविसंमेलनही रंगले. रवी कोरडे, जिजा शिंदे, अभय दाणी, क्षमा बर्डे, माधुरी चौधरी, अभिजीत बंगाळे तसेच न्याय सहाय्यक विज्ञान शाखेतील विद्यार्थीनी तेजल देशमुख यांनी सादर केलेल्या कवितांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. प्रथम क्रमांक आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागाच्या मयूर कमलाकर पाटील यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक मराठी विभागातील संशोधक मीनल सुभाष पाटील यांनी मिळवला, तर तृतीय क्रमांक मानसी अनिल बोरसे यांनी मिळवला. विजेत्यांना रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा.डॉ.विष्णू सुरासे यांनी केले.

### एमजीएममध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

कार्यक्रमास आंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, मराठी विभागातील डॉ.राम गायकवाड, तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ.रामेश्र्वर कणसे, इतिहास विभागाचे प्राध्यापक डॉ.भागवत वाघ यांसह विविध विभागांचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी काढण्यात आलेली ग्रंथदिंडी आणि एकूण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी विभागातील प्रा.डॉ.राम गायकवाड आणि मारुती गायकवाड, उर्दू विभागातील डॉ. अस्वद गोहर, डॉ. साजिद आलम, हिंदी विभागातील डॉ. शहनाज बासमेह, डॉ. सुरेखा लक्कस, इंग्रजी विभागातील डॉ. डॉ. रेहाना सय्यद, डॉ. सुप्रिया सांगवीकर, डॉ. वैशाली हजारे, डॉ. इम्रान पठाण, डॉ. गजानन देशमुख हेच कार्यालयीन कर्मचारी सौरभ वांडेकर आणि विशाल अहिरे यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन डॉ. रिहाना सय्यद, आभार डॉ. मारुती गायकवाड यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त...

### ह.भ.प. आश्रोबा महाराज खरात यांचे कीर्तन.

**सोनपेठ,/प्रतिनिधी:-** संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज बीज निमित्त सोनपेठ शहरातील श्री सोमेश्वर मंदिर परिसरातील संत तुकाराम महाराज मंदिर येथे गुरुवार दि. ५ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता अखिल भारतीय वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष हभप आश्रोबा महाराज खरात पाटील यांचे हरिकीर्तन होणार आहे,या कीर्तनाचा व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### भूमी अभिलेख निवृत्तांचा 'आनंदी स्नेह मेळावा' उत्साहात

**परभणी,/प्रतिनिधी :** भूमी अभिलेख विभागातील निवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा निवृत्तांचा आनंदी स्नेह मेळावा कारेगाव रोडवरील कौतुभ मंगल कार्यालय येथे २४ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांसह पुणे व मुंबई येथूनही मोठ्या संख्येने निवृत्त बांधवांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात सहभागींची नोंदणी करून मोत्याची माळ व गोड पदार्थ देत स्वागताने झाली. या कामी मोहम्मद पठाण, प्रभाकर डासाळकर, प्रल्हाद शिंदे, पंडीत वावरे व गंगाधर जाधव यांनी जबाबदारी पार पाडली. व्यासपीठावरील मान्यवर वि. भु. खेडकर, विजय मेहरा, अरविंद गिरीगोसावी, आप्पासाहेब गिरमकर, हिरामन पवार, सदाशिव घोडेकर, सुनिल शिंदे, गणपत गोंदवाड व रघुनाथ लाखाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य गीत तसेच प्रभाकर डहाळे यांच्या स्वयंरचित स्वागत गीताने वातावरण भारावून गेले. सोबत कार्य करून सेवानिवृत्त झालेल्या आणि आता आपल्यात नसलेल्या सहकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. परभणी भूमी अभिलेख निवृत्त संघाच्या सदस्यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. मनोहर पेडगावकर यांनी प्रास्ताविकातून मेळाव्याच्या उद्देशाची माहिती दिली.

प्रातिनिधिक स्वरूपात काही सहभागींनी आपले अनुभव व भावना व्यक्त केल्या. अरविंद गिरीगोसावी, आप्पासाहेब गिरमकर, सुनिल शिंदे व रघुनाथ लाखाडे यांनी मनोगतातून निवृत्तीनंतरही स्नेहबंध टिकविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात वि. भु. खेडकर यांनी राज्यातील विविध विभागांतील अनुभव कथन करत परभणी निवृत्त संघाचे कौतुक केले. मेळाव्याच्या निमित्ताने गिरीश राव, मिलिंद चव्हाण, विजयसिंह घनवट, गणेश यंदे, समुद्र व श्रीराम खिरेकर यांचे शुभेच्छा संदेश प्राप्त झाले. शीघ्रकवी गोविंद घाग यांनी तयार केलेली कविता शरद कुलकर्णी यांच्या आवाजात वाचून दाखवण्यात आली.

दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमात सदाशिव घोडेकर यांनी व्हायोलिन वादन, अनिरुद्ध खटींग व दिवाकर देशमुख यांनी हिंदी चित्रपटगीते, रामकिशन सवंडकर, गंगाधर महाजन, मुरलीधर टाक व सतिश मुंढे यांनी अभंग सादर केले. राजेंद्रप्रसाद जोशी यांनी स्तोत्र कथन केले, तर अरविंद गिरीगोसावी यांनी विनोदी चुटकुले सांगून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान उत्कृष्ट अल्पोपहार, चहा व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. गंगाधर जाधव, केशव परळीकर, भाऊराव देसाई, उध्दव निशाणकर, मोहम्मद पठाण, सुधीर पालमकर, पुरुषोत्तम खंडेलवाल, रामकिशन सवंडकर व सुरेश जोशी यांनी सर्वांना आत्मीयतेने भोजन वाढले. गट छायाचित्र सत्रानंतर सहभागींच्या हातात त्वरित छायाचित्रे देण्यात आली.

### सेलू अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; हायवा व टिप्पर जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** अवैध वाळू वाहतुकीविरोधात सेलू महसूल विभागाने करीत एक हायवा आणि एक टिप्पर जप्त केला.

सेलू-पाथरी रोडवरील गूगळी धामणगाव परिसरात आज ही कारवाई करण्यात आली. उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने अवैध वाळूची वाहतूक करणारा यूनूस पठाण यांचा हायवा ताब्यात घेतला. तसेच समीर सय्यद (रा. सोमठाणा) यांचा टिप्पर गूगळी धामणगाव हिस्सी रोडवर पकडण्यात आला.

या कारवाईत महसूल पथक प्रमुख मंडळ अधिकारी सारिका हेडगे, मंडळ अधिकारी बोधले, तलाठी प्रसाद मूळे व महसूल अधिकारी दीपक गांगुर्ड यांचा सहभाग होता. दोन्ही वाहनांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा महसूल विभागाने दिला आहे.

### डाखोरे यांच्या संतवाणीच्या सुरांनी रायपूर नगरी दुमदुमली

**परभणी,/प्रतिनिधी :** रायपूर येथे गावकऱ्यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'जागर प्रबोधनाचा' व्याख्यानमालेअंतर्गत शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी आमलकी एकादशी व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'संतवाणी' या कार्यक्रमात वारकरी संप्रदायातील संतांनी रचलेल्या अजरामर अभंगांचे सुमधुर गायन सुप्रसिद्ध गायक सच्चिदानंद डाखोरे यांनी सादर केले. त्यांच्या ओजस्वी व भावपूर्ण सादरीकरणाने उपस्थित रायपूरकर भारावून गेले. 'अवघा रंग एक झाला'सह विविध अभंगांच्या गायनातून भक्तिमय वातावरणाची निर्मिती झाली.

यावेळी संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत एकनाथ, संत मीराबाई, संत कबीर आदी संतांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि अध्यात्माचे महत्त्व सांगणाऱ्या रचनांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. अभंग गायनाला पखवाज वादक संतोष महाराज शिंदे यांनी समर्पक साथ दिली. बालगायक स्वानंद डाखोरे यांनी सादर केलेल्या भक्तिगीताने श्रोत्यांची मने जिंकली. संतवाणीचे निवेदन माधव गव्हाणे यांनी केले.
कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून बापूराव गाडेकर, तुकाराम मगर, रामराव गायकवाड, रामराव बोबडे, पद्माकर गोंडगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मण गाडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन दादासाहेब गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पांडुरंग गाडेकर, बाबासाहेब गाडेकर, पांडुरंग सोळंके, अंकुश गाडेकर, धोंडीराम गाडेकर, पार्थ गाडेकर, वेदांत गाडेकर, रामेश्वर गाडेकर, जिजाभाऊ हिंगे, जलील शेख, रवी महाराज, शिवाजी गाडेकर, नामदेव दिवटे आदींनी सहकार्य केले.

### विज्ञान दिनानिमित्त मराठवाडा हायस्कूलमध्ये विविध प्रयोगांचे सादरीकरण

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलच्या खंडोबा बाजार येथील मुख्य शाखेत शनिवार २८ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्या समितीचे सहसचिव तथा प्राचार्य अनंत पांडे होते. यावेळी व्यंकटेश तोरंबेकर, उपमुख्याध्यापक बाळकृष्ण कापरे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते शिरीष जयपुरकर यांनी सांगितले.

# सेलू नगर परिषदेत १३२ कोटींचा अर्थसंकल्प सादर

## चार वर्षांनंतर लोकनियुक्त नगराध्यक्षांची दमदार पुनरागमन; शहराचा आता विकास होणार

**सेलू ,/प्रतिनिधी-** चार वर्षांच्या प्रशासकीय कालावधीनंतर लोकनियुक्त नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांनी शुक्रवारी सेलू नगर परिषदेच्या सभागृहात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी तब्बल १३२ कोटी ५७ लाख ५९ हजार रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला. उत्पन्न व खर्चाचा समतोल साधत दोन लाख रुपयांची शिल्लक ठेवणारा हा अर्थसंकल्प विकासाभिमुख असल्याचे नगराध्यक्षांनी स्पष्ट केले.

यावेळी उपनगराध्यक्ष साईराज बोराडे, मुख्याधिकारी महेश गायकवाड, उपमुख्याधिकारी बी एस चव्हाण यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.

महसुली व भांडवली खर्चाचा ताळमेळ नगराध्यक्ष सावंत यांनी १३२ कोटी ५७ लाख ५९ हजार रुपयांच्या एकत्रित उत्पन्नाच्या आधारावर महसुली खर्च : २६ कोटी २६ लाख ४४ हजार रुपये त्यात आस्थापना खर्चासाठी १७ कोटी ६६ लाख २४ हजारांची तरतूद भांडवली खर्च : १०५ कोटी ७२ लाख ३० हजार २११ रुपये भांडवली खर्चात सोलार अनुदान व भूमिगत गटार योजना यासाठी प्रत्येकी २५ कोटी रुपये, असा एकूण ५० कोटींचा सर्वाधिक निधी राखून ठेवण्यात आला आहे. विकासकामांना प्राधान्य याशिवाय अंतर्गत विकासकामांसाठी १५ कोटी, रमाई व प्रधानमंत्री आवास योजनांसाठी ६ कोटी ४५ लाख, दलितवस्ती सुधारणा योजनेसाठी ५ कोटी, वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी ५ कोटी ६० लाख अशी तरतूद करण्यात आली आहे. राखीव निधीची तरतूद एकूण ५८ लाख ८४ हजार ७८९ रुपये आवश्यक राखीव निधी म्हणून ठेवण्यात आले आहेत. मागासवर्गीय दुर्बल घटक, महिला व बालकल्याण, अपंग कल्याण यासाठी प्रत्येकी ५ टक्के प्रमाणे ७ लाख १ हजार १२८ रुपये नैसर्गिक आपत्ती (०.५० टक्के) ७० हजार १८३ रुपये घनकचरा व्यवस्थापन (२५ टक्के) ३५ लाख ९ हजार १२८ रुपये उत्पन्नातून सर्व खर्च वजा जाता २ लाख रुपयांची शिल्लक राखून हा समतोल अर्थसंकल्प सादर करण्यात आला. चार वर्षांनंतर लोकनियुक्त नगराध्यक्षांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प शहरातील पायाभूत सुविधा, पर्यावरणपूरक उपक्रम आणि सामाजिक कल्याण योजनांना चालना देणारा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





### जिल्हा परिषद सावंगी म्हाळसा येथे केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनास भरघोस प्रतिसाद

**जिंतूर,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून आज दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी जि.प.प्रा.शा.सावंगी (म्हाळसा) येथे समूह साधन केंद्र- केहाळ अंतर्गत विद्यार्थ्यांची कल्पकता,विज्ञाननिष्ठ विचार व जिज्ञासू वृत्तीला वाव देण्यासाठी केंद्रप्रमख तथाज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.के.सी.घुगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे म्हणून जि.प.सदस्य श्री.विजयकुमार वाकळे, प्रा. पांडूरंग निळे,प्रा.डॉ.अशोक वैद्य, डॉ.पवन चव्हाण,डॉ. प्रशांत मूंढे,सुनिल बरडे, श्री.संजय स्वामी,प्रा.गजानन सांगळे,प्रा. सोनाली सांगळे,पत्रकार प्रविण मूळी,श्री.रवींद्र वाघ शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सावंगी म्हाळसा ऊपस्थित होते.उपस्थित सर्व पाहुण्याचे केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक यांनी स्वागत केले. प्रास्ताविक केंद्रप्रमुख के सी.घुगे यांनी केले.याप्रसंगी उपप्राचार्य पांडुरंग निळे व प्रा.डॉ.अशोक वैद्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जि.प सदस्या श्रीमती लताताई वाकळे यांचे पती विजयकुमार वाकळे यांचे हस्ते संपन्न झाले.
परीक्षक म्हणून प्रा.पांडुरंग निळे,प्रा.डॉ.अशोक वैद्य,केंद्रप्रमुख श्री संजय स्वामी,प्रा.गजानन सांगळे व प्रा.सोनाली सांगळे यांनी काम पाहिले.या केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये वर्ग १ ते ५ गटातून अनूक्रमे प्रथम क्रमांक-जि.प.प्रा.शा.मुरूमखेडा द्वितीय क्रमांक-जि.प.प्रा.शा.खोलगाडगा,तृतीय क्रमांक- जि.प.प्रा.शा.घडोळी तांडा या शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळविला आहे.

# सावरकरांच्या 'हिंदुत्वाचे पंचप्राण' विचारांचा सेलूत जागर

## एक दिवस एक पुस्तक उपक्रमात व्याख्यानास प्रतिसाद



**सेलू/प्रतिनिधी - :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी व कुसुमाग्रज जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर 'एक दिवस एक पुस्तक' या उपक्रमांतर्गत स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालय यांच्या वतीने शनिवारी (दि.२८ फेब्रुवारी २०२६) विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
या कार्यक्रमात सावरकर लिखित 'हिंदुत्वाचे पंचप्राण' या पुस्तकावर डॉ. दिवाकर कुलकर्णी यांनी अभ्यासपूर्ण व विचारप्रवर्तक मार्गदर्शन केले. उपेंद्र बेल्लुरकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम उत्साहात पार पडला.
कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य विनायकराव कोठेकर, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, ग्रंथालयाचे सचिव चंद्रशेखर मुळावेकर, दत्तात्रय माकोडे, महेश खारकर यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.
याच प्रसंगी ग्रंथालयाचे ग्रंथपाल महादेव आगजाळ यांना उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.
व्याख्यानात बोलताना डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, सावरकरांनी मांडलेल्या हिंदुत्वाच्या विचारधारेतील "पंचप्राण" संकल्पना हिंदू समाजाची ओळख, एकात्मता आणि राष्ट्रभावना दृढ करणारी आहे. देशभक्ती, सामायिक संस्कृती, भाषा, इतिहास व परंपरा या घटकांद्वारे सांस्कृतिक राष्ट्रवादाची जाणीव निर्माण होते. हिंदुत्व ही केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक-राष्ट्रीय ओळख असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले, तर प्रा. भाग्यश्री धामणगावकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन चंद्रशेखर मुळावेकर यांनी केले.

# माधवराव पाटील महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**पालम,/प्रतिनिधी :-** माधवराव पाटील महाविद्यालयात दि. २७ रोजी मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य वि. वा. शिरवाडकर याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. डी.अरसुळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एच. डी. सातपुते व डॉ. बी. व्ही. शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. बी. व्ही. शिंदे यांनी मराठी ही प्राचीन व समृद्ध भाषा असून तिचा दैनंदिन जीवनात जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. मराठी भाषा ज्ञानभाषा झाली तरच तिचे संवर्धन व प्रसार अधिक प्रभावीपणे होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा मिळाल्यास ज्ञानवृद्धीला गती मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.



डॉ. ए. डी. अरसुळे यांनी मराठी भाषेचा सांस्कृतिक वारसा अत्यंत मोठा व अभिमानास्पद असल्याचे सांगितले. या वारशाचे जतन आणि संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मराठी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असून त्यामुळे तिची उपयुक्तता अधिक वाढली आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कालिदास गुडदे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. जि. ए. कऱ्हाळे यांनी केले.



### जिंतूरातील धमधम येथे १० विशाल बौध्द धम्म परिषद साजरी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील धमधम येथील धम्मटेकडीवर सामाजिक कार्यकर्ते सुभाष वाव्हळे याच्या पुढाकारातून १०वी विशाल बौद्ध धम्मपरिषद मोठ्या थाटामाटात साजरी झाली.
यावेळी भन्ते महानद यानी उपस्थिताना धम्मदेसना दिली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते अरविद काम्बळे, बौद्धाचार्य शिवाजी लाटे सर, बौद्धाचार्य आनदाराव वाकळे, सामाजिक कार्यकर्ते किरण घोगडे,रत्नदिप शेजावळे, प्रितम वाकळे याची प्रमुख व्याख्याने झाली तर वाल्मिक टाकरस, गजानन कागणे, राहुल घुले यान्ची प्रमुख उपस्थिति होती सायकाळी भोकरदन येथील भीमशाहिर शाहिर विनोद जाधव आणि त्याचा सन्च यानी भीम बुद्ध गीताच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. धम्मपरिषद यशस्वितेसाठी मारोती शिन्दे, रमेश प्रधान यशोदाबाई शिन्दे, रगनाथ ताठे, धम्मपाल मोरे यानी परिश्रम घेतले.

# सोनपेठ नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात शहर विकासावर भर

## १०१ कोटी ४९ लाख २० हजार रुपयांचा अर्थसंकल्प सादर

**सोनपेठ ,/प्रतिनिधी:** सोनपेठ नगरपरिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा तब्बल १०१ कोटी ४९ लाख २० हजार रुपयांचा अर्थसंकल्प शनिवार २८ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आला. नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला असून शहरातील पायाभूत सुविधा आणि सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात आला आहे.

बैठकीला मुख्याधिकारी युवराज पौळ, उपनगराध्यक्ष निलेश राठोड, गटनेत्या सारिकाताई विटेकर, गटनेते सद्दाम हुसेन, लेखापाल दादासाहेब पौळ, धम्मपाल किरवले यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या १०१ कोटी ४९ लाख २० हजार रुपयांच्या या अर्थसंकल्पातून शहराच्या कायापालटासाठी विविध योजना आखण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने शहरातील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण, कॉंक्रिटीकरण आणि शहराअंतर्गत रस्त्यांसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. नगरपरिषदेच्या वाचनालयासाठी नवीन पुस्तक खरेदीसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे, अनावश्यक खर्चांना फाटा देण्यात आलेला आहे. तसेच पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी बंदिस्त गटारांचे जाळे विस्तारले जाणार आहे.

'स्वच्छ भारत अभियानांतर्गत' घनकचरा व्यवस्थापन आणि शहराच्या स्वच्छतेसाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करण्यावर भर दिला आहे. तसेच शहराच्या वाढत्या विस्तारानुसार प्रत्येक घरापर्यंत शुद्ध आणि मुबलक पाणी पोहोचवण्यासाठी जलवाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी निधी प्रस्तावित आहे. स्वच्छ पाणी देण्यासाठी विशेष तरतूद केल्यामुळे यापुढे शहराला अधिक स्वच्छ पाणी मिळणार आहे. नागरिकांच्या मनोरंजनासाठी सार्वजनिक उद्यानांचे सुशोभीकरण करण्यासही प्राधान्य दिले आहे.

मुख्याधिकारी युवराज पौळ यांनी अर्थसंकल्पातील तांत्रिक बाजू आणि जमा-खर्चाचा तपशील मांडत शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी हा अर्थसंकल्प शहराच्या प्रगतीचा ठरणार असल्याचे सांगितले. शहरातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात आल्याने नागरिकांमधून सुध्दा समाधान व्यक्त होत आहे.

### शहराचा विकास साधण्याचा प्रयत्न - नगराध्यक्ष कदम

**हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांच्या हिताचा असून, कोणत्याही नवीन कराचा बोजा न टाकता शहराचा विकास साधण्याचा आमचा प्रयत्न आहे. राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त निधी खेचून आणून सोनपेठ शहराला आदर्श शहर बनवू, असा विश्वास यावेळी नगराध्यक्ष कदम यांनी यावेळी व्यक्त केला.**

## रोखठोक

दिनेश गुणे

# हे आव्हान सोपे नाही...!

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजात दुसऱ्या दिवशी, २४ फेब्रुवारीला प्रश्नोत्तरांच्या तासातील चर्चेत उघड झालेल्या एका समस्येने पुन्हा एका आव्हानाचे गांभीर्य स्पष्ट केले आहे. एकट्या मुंबई शहरात जानेवारी ते ११ फेब्रुवारी या जेमतेम दीड महिन्याच्या काळात सुमारे आठ कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. गेल्या वर्षभरात अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी ११४१ गुन्हे दाखल करण्यात आले, १४५४ व्यक्तींना अटक करण्यात आली आणि सुमारे साडेआठशे कोटी रुपये किमतीचा अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. एमडी (मेफॅड्रॉन) नावाच्या अमली पदार्थाचा ३१३ किलो वजनाचा साठा जप्त करून ३९४ व्यक्तींना अटक करण्यात आली. मस्जिद बंदर परिसरात सुमारे ३२५ ग्रॅम वजनाची गर्द पावडर जप्त करण्यात आली. अमली पदार्थांच्या अवैध धंद्याचे हे जाळे एकट्या मुंबईत नव्हे तर नाशिक, त्र्यंबकेवर, जव्हार, रायगड, नवी मुंबई अशा अनेक ठिकाणी पसरलेले आहे. गेल्या वर्षभरात पाच हजारांहून अधिक व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. १३०० कोटींहून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आणि अमली पदार्थविरोधी मोहिमा अधिक तीव्र करण्यात आल्या. एका वर्षभरातील या कारवाया आणि हस्तगत करण्यात आलेला साठा पाहता, अमली पदार्थांच्या विरोधातील लढाई आणि या धंद्याला वेसण घालण्याचे आव्हान यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचल्याचे स्पष्ट होतेच; पण हे आव्हान सोपे नाही, याचीही जाणीव अधोरेखित होते.

अमली पदार्थांच्या नशेचा तरुण पिढीवरील विळखा हा आजची समस्या नाही. देशातील हजारो कुटुंबांतील नवी पिढी या व्यसनांच्या आहारी जाऊन अंधाराच्या गर्तेत चाचपडू लागली आहे. धनिकांच्या जगात अशा व्यसनांना प्रतिष्ठेने मिरविले जात असल्याने उच्चभ्रूंच्या पार्ट्यांमधील अमली पदार्थांचे सेवन हा अधूनमधून चर्चेचा विषय होत असला, तरी सामान्य कुटुंबातील तरुणाईला पडणारा विळखा हा केवळ चर्चेचा नव्हे, तर गंभीर चिंतेचा विषय असतो. गेल्या काही वर्षांत या नशेच्या आहारी जाणाऱ्यांची संख्या वाढतच चालली असल्याचे, जागोजागी उभ्या असलेल्या नशामुक्ती केंद्रांतील गर्दीवरून स्पष्ट दिसते. या समस्येला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने काही वर्षांपूर्वी, 'नशामुक्त भारत' नावाची एक मोहीम सुरू केली, तेव्हा या व्यसनांच्या विळख्याने देशाचा केवढा मोठा भाग व्यापला आहे, तेदेखील उघड झाले. देशातील तब्बल पावणेतीनशे जिल्ह्यांत अमली पदार्थांचा व्यापार होत असून त्याच्या आहारी जाणाऱ्या तरुणाईची संख्या वाढत असल्याचे केंद्र सरकारच्या एका पाहणीत स्पष्ट झाले होते. नशेच्या विळख्यात अडकलेल्या तरुणांना त्यातून सोडविण्यासाठी आठ हजार स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. या कार्यकर्त्यांनी या जिल्ह्यांतील तब्बल ८० लाख स्त्री-पुरुष आणि तरुणांवरील या समस्येचे गारुड उतरविण्यासाठी धडपड केली होती. नशेच्या विळख्यातून सोडविण्यासाठी या जिल्ह्यांत जवळपास ४०० नशामुक्ती केंद्रांतून उपचार आणि मानसोपचारांची सोय करण्यात आली. देशभरातील १८ ते ७५ वयोगटांतील १७ टक्के जनता दारूचे सेवन करते, जवळपास तीन टक्के लोक भांगेच्या नशेत बुडवून घेतात, दोन कोटी लोकांना अफूची चटक लागलेली आहे तर एक कोटींहून अधिक व्यक्ती नशा करण्यासाठी औषधांचाही वापर करतात, असे उघडकीस आले आहे. जवळपास ५० लाख व्यक्ती नशिले पदार्थ हुंगून आपली व्यसने भागवितात तर जवळपास १० लाखांना कोकेनचा विळखा पडला आहे. याच पाहणीचा आणखी एक निष्कर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने चिंताजनक आहे. या कोकेन नशाबाजांपैकी जवळपास निम्मे नशेबाज एकट्या महाराष्ट्रात आहेत, असे केंद्र सरकारच्या एका अधिकृत आकडेवारीवरून दिसते. उत्तेजक औषधांचे सेवन करणाऱ्या सुमारे १५ लाखांपैकी सुमारे साडेचार लाख लोक महाराष्ट्रात आहेत. अर्थात ही अधिकृत आकडेवारी असली, तरी अनधिकृतांचा आणि छुप्या नशेबाजांचा आकडा याहून कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे.

वरकरणी सहज वाटणाऱ्या एखाद्या गोष्टीकडे अधिक गांभीर्याने पाहिले तर त्यामागचे अनेक कंगोरे एकामागून एक उलगडत जातात आणि ती सहज गोष्टदेखील जटिल असल्याचे लक्षात येते. सुमारे तीन दशकांपूर्वीच्या एका नोंदीमुळे अशाच एका वरकरणी सहज वाटणाऱ्या गोष्टीमागील गांभीर्य स्पष्ट झाले होते. समाजाची स्मृती अल्प असते या समजुतीनुसार आता त्याचा विसर सर्वांस पडला असेल. पण नुकत्याच उजेडात येऊ लागलेल्या काही घडामोडींमुळे त्या गोष्टीच्या आठवणीस उजाळा देणे आवश्यक आहे. बाबरीची वादग्रस्त वास्तू उद्ध्वस्त झाल्यानंतर मुंबईत उफाळलेल्या भीषण दंगली, हिंसाचार, दहशतवादी कारवाया, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार अशा असंख्य समस्यांमुळे पिचून गेलेल्या जनतेला पर्याय मिळाला आणि काँग्रेसी वर्चस्वाखालील प्रस्थापित सत्ता उलथवून टाकून महाराष्ट्रातील जनतेने शिवसेना-भाजपा युतीला सत्तास्थापनेचा कौल दिला, तेव्हाची ही गोष्ट आहे. युतीच्या त्या सरकारचे पहिले बिगरकाँग्रेसी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राच्या प्रस्थापित जातवर्चस्वाच्या राजकारणास बगल देऊन सत्तेच्या सर्वोच्च पदावर आरूढ झालेले मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या पदग्रहणानंतरच्या पहिल्याच वर्षातील अर्थसंकल्पीय अधिवेशनातील काही प्रकाशनांपैकी एका प्रकाशनाने ही गोष्ट अधोरेखित केली होती. कारण ज्या समजुतीपायी आपण दानधर्माच्या संस्कृतीचा भाग म्हणून भिकाऱ्यांच्या झोळीत पैसे टाकतो, त्या पैशाचे पुढे काय होत असावे, याचा विचार करावयास लावणारे काही सूक्ष्म संकेतच त्यातून दिले गेले होते. मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये दररोज शेकडो भिकारी त्यांच्या कमावलेल्या व्यावसायिक केविलवाण्या चेहऱ्याने प्रवाशांसमोर हात पसरतात. गरिबास दान केल्याने



पुण्य पदरी पडते, या समजुतीतून हजारो प्रवासी आपल्या कमाईचा काही वाटा त्या झोळीत टाकून पुण्य कमावल्याच्या भावनेने समाधान पावतात. युती सरकारच्या त्या पहिल्या अर्थसंकल्पीय कागदपत्रांतून मात्र, या पुण्याच्या समजुतीमागील प्रथेवरच प्रश्नचिन्ह उभे केले गेले होते. भिकाऱ्यांच्या झोळीत पैसे टाकण्याऐवजी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ते पैसे पाठवा आणि समाजातील गरजूंना त्याचा लाभ व्हावा यासाठी हातभार लावा, अशा आशयाचे थेट विधान त्या प्रकाशनात करण्यात आल्याने तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या, टीकेचे सूरही उमटू लागले आणि प्रश्नचिन्हेही उभी राहिली. ही चर्चा तेव्हा फार काळ चालली नाही, पण त्या विधानाच्या समर्थनार्थ दिले गेलेले स्पष्टीकरण मात्र बोलके होते. भीक मागणे हा एक संघटित व्यवसाय असून गुन्हेगारी विश्व किंवा अमली पदार्थांच्या व्यापाराशी या व्यवसायाचे नाते असल्याचा संशय व्यक्त होत असल्याने, पुण्य मिळविण्याच्या भावनेतून दान केलेला पैसा दिवसाअखेरीस कोणत्या तरी अड्ड्यावरील अमली पदार्थाच्या खरेदीत खर्च होत असल्याने, असा पैसा खऱ्या अर्थाने सत्कार्याकडे वळविण्याच्या हेतूने हे आवाहन केले गेल्याचा खुलासाही तेव्हा करण्यात आला होता. मनोहर जोशी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीतील या मुद्याने अनेकांना भीक मागण्याच्या व्यवसायाकडे पाहण्याची नवी नजर मिळाली, हे नाकारता येणार नाही. अशा दानधर्माच्या पैशापैकी किती पैसा त्यांच्या आवाहनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे वळला हे पुढे स्पष्ट झाले नसले, तरी भीक मागून मिळालेला पैसा हा अमली पदार्थांच्या धंद्याचा मोठा आधार ठरत असल्याची बाब मात्र गुपित राहिली नाही. म्हणूनच अमली पदार्थांच्या धंद्याला बळ देणाऱ्या साऱ्या वाटा बुजविण्याच्या मोहिमेचा एक प्रयत्न म्हणून त्या नोंदीकडे पाहणे आवश्यक ठरते.

आज पुन्हा ही नोंद समोर येण्याचे कारण स्पष्ट आहे. महाराष्ट्रात अमली पदार्थांच्या अवैध धंद्याविरोधातील कारवाया तीव्र होऊ लागल्या आहेत. सध्याच्या कारवायांमधून हस्तगत होत असलेले हे अमली पदार्थांचे शेकडो कोटी रुपये किमतीचे साठे भीक मागणाऱ्या व्यसनाधीन व्यक्तींच्या आर्थिक आवाक्याबाहेरील आहेत आणि आता या धंद्याने धनदांडग्या वर्गाभोवतीही आपला विळखा घट्ट करण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. अमली पदार्थांचा व्यापार किंवा धंदा ही केवळ एखाद्या विशिष्ट क्षेत्रापुरती समस्या राहिलेली नाही, तर या व्यवसायाने आंतरराज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले हातपाय पसरले आहेत. त्याला पुष्टी देणारे असंख्य धागेदोरे आता तीव्र करण्यात आलेल्या कारवायांतून समोर येऊ लागले आहे. सुमारे पाच वर्षांपूर्वीच्या एका पाहणीनुसार, मुंबईत वेगवेगळ्या मार्गाने भीक मागणाऱ्यांची लोकसंख्या गेल्या दशकभरात एक लाखांनी वाढली होती. एकट्या मुंबईत जवळपास तीन लाख व्यक्ती भीक मागण्याचा व्यवसाय करतात, असे निष्पन्न झाले होते. यापैकी अनेक भिकारी केवळ दारिद्र्यामुळे भीक मागण्याचा मार्ग पत्करत असले, तरी अनेक भिकारी व्यसनांची गरज भागविण्याकरिता लोकांसमोर हात पसरतात, हेही स्पष्ट झाले होते. वेगवेगळ्या मार्गाने भिकेच्या माध्यमातून होणारी प्रत्येक भिकाऱ्याची किमान कमाई दिवसाकाठी ५० रुपयांहून अधिक असल्याचे गृहीत धरले, तरी तीन लाख भिकाऱ्यांच्या झोळीत मुंबईकरांकडून दिवसाकाठी किती रक्कम पडत असेल आणि त्यापैकी किती रक्कम व्यसनांवर खर्च होत असेल, याचा साधारण अंदाज बांधणे फारसे अवघड नाही. मनोहर जोशी यांच्या आवाहनाचा तोच रोख होता. अमली पदार्थांचे अवैध धंदे पोसण्यास ज्या काही बाबींचा हातभार लागतो, त्यामध्ये आता अधिक भर पडली आहे. उच्चभ्रूंच्या पार्ट्यांतही अमली पदार्थांचा शिरकाव झाल्याच्या कहाण्या आता समाजाच्या सवयीच्या झाल्या आहेत आणि या समस्येपायी अनेक कुटुंबे आपल्या घरातील कोणा तरुणाच्या भविष्याच्या काळजीने काळवंडली आहेत.

या समस्येविरुद्ध केंद्र सरकारने कंबर कसली आणि अमली पदार्थांच्या धंद्याचे कंबरडे मोडण्याच्या मोहिमा तीव्र झाल्या. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुणे शहरात अमली पदार्थांच्या अवैध धंद्याने आपली पाळेमुळे रुजविली असल्याचे ललित पाटील प्रकरणावरून उघड झाले होतेच; पण अजूनही ती पुरती उखडली गेलेली नाहीत, हेही आता नव्या कारवायांतून समोर येऊ लागले आहे. मेफेड्रोन हा जगातील सर्वात महागडा मानला जाणारा अमली पदार्थ महाराष्ट्रात 'म्याऊ म्याऊ' म्हणून नशेखोरांच्या दुनियेत ओळखला जातो. हा पदार्थ खाद्यपदार्थांच्या वेष्टनातून विदेशात पाठविण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आणि त्यांनी जाळे पसरल्यावर हाती आलेले धागेदोरे दिल्लीपर्यंत पोहोचले.

याच धागेदोऱ्यांच्या आधाराने दिल्ली गाठून केलेल्या कारवाईतही मेफेड्रोनचा मोठा साठ जप्त करण्यात आला. त्या एकाच कारवाईत मेफेड्रोनचा सुमारे १७०० किलो साठा जप्त करण्यात आला होता. यापैकी सुमारे ६०० किलो मेफेड्रोनचे उत्पादन पुणे-सोलापूर मार्गावरील एका औद्योगिक वसाहतीतील कारखान्यात होत असल्याचेही पोलिसांनी उघड केले. या साठ्याची किंमत साडेतीन हजार कोटींच्या घरात असावी, असा अंदाज असल्याने या व्यवसायातील उलाढालीने अर्थव्यवहार कसा पोखरला आहे, याचा अंदाज करता येणेही अवघड नाही. मांजराचा विशिष्ट आवाज काढून सांकेतिकरीत्या या पदार्थाची विक्री करणाऱ्या टोळ्या ग्राहकास आकृष्ट करीत असल्याने त्यास 'म्याऊ म्याऊ' असे म्हटले जात असावे. अलिकडच्या कारवायांतून उघड झालेल्या या नव्या गुपितामुळे समाजासही सावध राहणे आता शक्य होणार आहे.

अमली पदार्थमुक्त भारत ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असून याबाबत केंद्र सरकारने शून्य सहनशीलता धोरण स्वीकारले आहे. तीन वर्षांपूर्वी गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत सुमारे ९३०० किलो वजनाचे १२३५ कोटी रुपयांचे अमली पदार्थ नष्ट करण्यात आले. त्याआधी देशात वेगवेगळ्या कारवायांत ७५ हजार किलो अमली पदार्थ नष्ट करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. ते उद्दिष्ट तर पार झालेच; पण त्याहून कितीतरी पुढचा टप्पा गाठून ५ लाख ९५ हजार किलो अमली पदार्थांचा साठा नष्ट करण्यात आला. त्याची किंमत सुमारे साडेआठ हजार कोटींच्या घरात होती. अस्थिर जगण्याला सुरक्षिततेची ग्वाही देणारे काही आसपास घडले की, साहजिकच समाजाला मोठा मानसिक आधार मिळतो आणि मानसिकदृष्ट्या स्वस्थ असलेल्या समाजात शांतता प्रस्थापित होते. अस्वस्थ, संतप्त किंवा असुरक्षित समाजामुळे सार्वजनिक स्वास्थ्य संपते आणि अस्थिरता निर्माण होते. या अस्थितरतेची मुळे अशाच अवैध धंद्यांच्या खतपाण्यावर पोसली जात असतात.

अमली पदार्थांपासून स्वातंत्र्य मिळविण्याचा हा लढा सोपा नाही. ही समस्या देशाच्या भौगोलिक सीमांपुरती मर्यादितही नाही. या समस्येने आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडल्या असून भारताच्या नव्या पिढ्यांना बरबाद करण्याचे आणि भारतातील पैसा परदेशांत पळविण्याचे एक आंतरराष्ट्रीय षडयंत्र अधोरेखित झाले आहे. याआधीही गुजरातच्या बंदरांवरून महसूल गुप्तचर खात्याने केलेल्या आठ कारवायांमध्ये हजारो कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. नौदलाच्या एका कारवाईत कोची बंदराजवळ तीन हजार कोटींचा साठा हस्तगत करण्यात आला. कोरोना काळात अमली पदार्थांचे सेवन आणि अवैध व्यापारात तिप्पट वाढ झाल्याची नोंद आहे. गेल्या दशकभरात अमली पदार्थांचा व्यापार, मानवी तस्करीसारख्या समस्यांनी अनेक कुटुंबांच्या स्वातंत्र्याच्या आनंदावर काजळी धरली आहे. कित्येक कुटुंबे अक्षरशः उद्ध्वस्त झाली आहेत आणि कित्येकांचे भविष्य टांगणीला लागले आहे. महाराष्ट्रात या अवैध धंद्याचे कंबरडे मोडले जात आहे, ही आश्वासक बाब विधिमंडळातील ताज्या माहितीवरून स्पष्ट झाली आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### कुटुंब प्रबोधन, जनजागरणाचा विषय

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पंच परिवर्तनच्या विषयांवर जनजागरण करण्याचे आवाहन केले आहे. त्यातील एक विषय आहे कुटुंब प्रबोधन. विद्यमान पारिवारिक, सामाजिक परिस्थिती लक्षात घेता कुटुंब प्रबोधन करणे गरजेचे आहे. पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्यावेळी समस्या चार भिंतीच्या आत सोडवल्या जात. त्यात घरातील ज्येष्ठांची भूमिका महत्त्वाची होती. ते समस्यांवर तोडगा काढत असत. त्यांनी घेतलेल्या निर्णयावर वादविवाद होत नसत. त्यामुळे घरातील वातावरण सुदृढ, आनंदी राहत असे. ज्येष्ठांचा मान राखला जात असे. त्यांच्या शब्दाला, कृतीला वजन होते. जसजसा काळ बदलत गेला परिस्थितीत बदल होत गेला. परिवारची परिभाषा बदलली. असे बरेच परिवार आहेत जिथे ज्येष्ठांना आपले स्थान शोधावे लागत आहे. 'हम दो हमारा एक या दो' इतकाच सीमित परिवार आता राहिला आहे. त्यामुळे अनेक समस्यांनी जन्म घेतला आहे. मी अशा परिवाराच्या संपर्कात असतो जिथे ती माउली आपल्या ९७ वर्षांच्या सासूला आधार देत काळजीने, गोडीगुलाबीने आपली जबाबदारी सांभाळत आहे. एक मुलगा अमेरिकेला तर दुसरा बंगळुरूला आहे, पण आपल्या आजीचे आणि आईचे संगोपन करण्यात कसूर करीत नाही. आवश्यक सर्व वस्तू ऑनलाईन पाठविण्याची व्यवस्था ही मुलं करीत असतात. सकाळ-संध्याकाळ संपर्कात असतात. त्यामुळे त्या माउलीला एकटेपणाची जाणीव होत नाही. याला आपण आदर्श कुटुंब म्हणू शकतो. दुसरीकडे असाही परिवार बघितला जिथे जन्म देणारे आई-वडील नकोसे वाटतात. दुर्दैवाने अशा परिवारांची संख्या अधिक आहे. पंच परिवर्तनमध्ये कुटुंब संस्कृतीला प्राधान्य देण्याचे हे एक कारण असू शकतं. काळ बदलला की व्यवस्था परिवर्तन होणारच असे बोलले जाते. परिवर्तन म्हणजे कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त करणे नव्हे. नाती जोपासल्या गेली पाहिजे; मग ती रक्ताची असो अथवा नसो. युवा पिढीमध्ये सहनशीलतेचा अभाव आहे. सामाजिक समस्या निर्माण होण्याचे ते एक कारण असावे. विवाह व्यवस्था मोडकळीस येत चालली आहे. घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. समजूतदारपणाचा अभाव आहे. जुळवून घेणे यावर विश्वास राहिला नाही. कुटुंब प्रबोधनच्या माध्यमातून या परिस्थितीत बदल होऊ शकतो; नव्हे अपेक्षित बदल व्हायला पाहिजे. यातच कुटुंबाचे हित सामावले आहे.

**वसंत पिंपळापुरे** /९४२२८०७०१३

### जीवघेणे रस्ते अपघात : गंभीर समस्या



जवळपास रोज वर्तमानपत्रात 'हिट अँड रन' तसेच इतर प्रकारचे गंभीर रस्ते अपघात घडल्याचे वाचण्यात येते. नुकताच असा एक अपघात प्रतापनगर रोडदरम्यान राधे मंगलम कार्यालय ते स्वरूप नगर/स्वावलंबी नगरच्या रस्त्यावर झाला. एका होतकरू महिलेला कारने धडक देऊन ठार केले. कार चालक व त्याचा साथी पकडला गेला. चालक नशेत होता असे बोलले जाते. तसेच त्याने या महिलेला धडक देण्याआधी अजून दोन जणांना ठोस मारली होती. त्यामुळे घाबरून त्याने बेभान होऊन गाडी दामटली.

सिमेंट रोड जसे रुंद होत आहेत तसेच वाहन चालकांचा वेग अनियंत्रित होत आहे. पालकांच्या दुर्लक्षपणामुळे अल्पवयीन मुळे बेभान होऊन गाड्या हाकत आहेत. आज शहराची स्थिती अशी आहे की, रस्ते रुंद होत आहेत व फूटपाथ गायब होत आहेत. जिथे व्यवस्थित फूटपाथ आहेत ते अधिकतर दुकानदारांनी गिळंकृत केले आहे; ज्याला राजाश्रय असल्यामुळे कोणी काही करू शकत नाही. पादचाऱ्यांना नाईलाजाने रस्त्यावरूनच चालावे लागते. याचे ज्वलंत उदाहरण सावरकर नगर चौक ते खामला, प्रतापनगर, देवनगर येथे बघता येईल. हे सर्व फूटपाथ मोकळे करून त्याला समोर कठडे करून पादचाऱ्यांना दिलासा देणे आवश्यक झाले आहे. लहान गल्ल्यांमधील रस्ते सिमेंटचे केले; पण ते मुख्य रस्त्याला जोडताना कुठेही गतिरोधक नाही. सदरहू अपघाताबद्दल लिहायचे म्हणजे हा रस्ता बराच रुंद झाला असून पायी चालण्याच्या दृष्टीने भीतिदायक आहे. तिथे फूटपाथ नाही. रस्त्याला लागून मोठमोठ्या फ्लॅट स्कीम व उच्चभ्रूंचे बंगले आहेत. शासनाच्या गलथान कारभाराचा फटका सामान्य नागरिकांना बसतो आहे. वास्तविकता ही आहे की, जीवघेणे अपघात दिवसेंदिवस वाढत आहेत. हा विषय गंभीरपणे विचारात घेऊन शासनाने प्रभावी पावले उचलावी हीच अपेक्षा? नुसते सिग्नल लावून समस्या सुटणार नाही, सिग्नल तोडणारे व वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कडक शिक्षा होणार नाही तोपर्यंत हे निरर्थक आहे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### व्यावहारिक प्रगल्भता हवी

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी भाषेबद्दल एक फेसबुक पोस्ट शेअर केली होती. एका जपानी तरुणीचा संदर्भ देत त्यांनी परदेशी पाहुण्यांना मराठीबद्दल असणाऱ्या कुतूहलाचं कौतुक करत स्वकीयांच्या मराठी भाषेविषयी असणाऱ्या अनास्थेबाबत खंत व्यक्त केली होती. यावरून एक मराठीतील अत्यंत मार्मिक म्हण आठवली 'अर्थावाचून पाठांतर, काय कामाचे?' जोपर्यंत आपल्याला एखाद्या शब्दातील मूळ भाव किंवा विचार समजत नाही, तोपर्यंत केवळ पोपटपंची करण्याला काहीच अर्थ नसतो. संत तुकाराम महाराजांनीही याच भूमिकेतून सांगितले आहे की, अर्थ माहीत नसताना केलेली घोकंपट्टी म्हणजे वेळ वाया घालवणे आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण झाली. या निमित्त विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमाचा मुख्य उद्देश संघाची ध्येयधोरणे आणि उद्दिष्टे स्पष्ट करणे, शंका-कुशंका दूर करणे हा होता. अशा मोठ्या राष्ट्रीय व्यासपीठावर, जिथे देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले श्रोते असतात, तिथे संवादाची भाषा 'सर्वसमावेशक' असणे ही व्यावहारिक गरज असते. केवळ दोन-चार शब्द मराठीत बोलल्याने संघाचे शंभर वर्षांचे कार्य किंवा त्यांचे उदात्त विचार सर्वांपर्यंत पोहोचले असते असे नाही. त्यामुळे एका परदेशी तरुणीचे कौतुक आणि एका राष्ट्रीय संघटनेची प्रामुख्याच्या संवाद शैलीची तुलना करणे एकतर तांत्रिकदृष्ट्या विसंगत ठरते. यावरून आपली संकुचित वृत्ती मात्र स्पष्ट होते. शेवटी, भाषा हे संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे, पण त्यातून व्यक्त होणारे विचार आणि राष्ट्रहिताची उद्दिष्टे त्याहूनही महत्त्वाची असतात. एखाद्या राष्ट्रीय स्तरावरील संघटनेचा प्रवास मांडताना, भाषेच्या सीमा ओलांडून तो विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविणे काळाची गरज असते. केवळ भावनिक अस्मितेत अडकून न राहता, आपण कोणत्या व्यासपीठावर आहोत आणि आपला मुख्य उद्देश काय आहे, याचे भान राखणे यावेळी जास्त महत्त्वाचे आहे. भाषेचा आदर असायलाच हवा, पण तो विचारांच्या देवाणघेवाणीत अडथळा ठरू नये, हेच व्यावहारिक सत्य आहे. 'मराठी' असण्याचा अभिमान बाळगतानाच, जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर संवाद साधताना लवचीकता असणे हेच प्रगल्भतेचे लक्षण आहे. अस्मिता जपलीच पाहिजे, पण ती प्रगतीच्या किंवा विचारांच्या प्रसाराच्या आड येता कामा नये.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### संस्कार आणि घड्याळासारखे जीवन

मुलांवर वयाच्या आठव्या वर्षापर्यंत उत्तम संस्कार घडवले तर ती प्रजा उत्तम व बुद्धिमान होते, हा निसर्गनियम आहे. परंतु सध्या काही वेगळेच चित्र बघायला मिळते. ज्यात द्वेष नावाचा (कु)संस्कार पदोपदी दिसतो आहे. सहजपणे सजीव (त्यात बॅटरी असलेले) घड्याळाच्या काट्यांकडे पाहिले तर किती ज्ञान मिळते, हे एक नवल आहे. प्रत्येक दिशेला ते नमस्कार करीत असतात आणि आपले जीवन दुसऱ्यांकरिता सत्कारणी लावतात. हे ज्ञान प्राप्त करणे म्हणजेच संस्कार आहेत. ते काटे कर्म करायला शिकवितात. ऊर्जा, चैतन्य, श्वास आणि उच्छवास दुसऱ्यांसाठी खर्च कर असेच ते काटे बोध करताना दिसतात. घड्याळ बघून जन्म आणि मरण होत नसते, परंतु संपूर्ण आयुष्य घड्याळाच्या काट्यांवरच केंद्रित असते. स्वतःसाठी ते जगत नाहीत. मुद्दा एवढाच आहे की, अजित पवारांच्यासाठी वरळी धील डोम सभागृहात जी शोकसभा झाली त्यावेळी असंख्य मान्यवर उपस्थित होते. जेव्हा सभागृहात माननीय व्यक्ती प्रवेश करते तेव्हा तिचा आदर प्रत्येक जण उभे राहून करतोच हा पायंडा (प्रोटोकोल) आहे.

असे असताना माजी आमदार व कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरे एकनाथ शिंदेंच्या आगमनाच्या वेळी मठ्ठपणे बसून होते. कदाचित आपण त्यांचा अपमान केला हीच भावना त्यांच्या मनात असणार; परंतु अशा द्वेषी वागण्याने आदित्यवर घरचे संस्कार नाहीत, हेच जगाने पाहिले असेल. दुसरीकडे रोहित पवार स्वतःजवळ कोणताच पुरावा नसताना रोजच्या रोज पत्रकार परिषद घेऊन करमणुकीचा खेळ करताना दिसतात, पण अजूनपर्यंत एकही एफआयआर दाखल करता आला नाही. जो मुख्य विषय आहे तो बाजूला ठेवून जनता मूर्ख आहे, या भावनेत वावरताना दिसतात. त्यामुळे आपल्या आजोबांच्या पक्षाची जी पूर्व निशाणी घड्याळ होती तिच्याकडून ते कोणतेच संस्कार आत्मसात करू शकले नाहीत, याचे दुःख आहे. आयुष्य हे द्वेषी विचारांनी जगण्यासाठी नाही तर कोणतीही अपेक्षा न करता जगण्यासाठीच असते, हेच प्रत्येकाने आत्मसात करणे आवश्यक आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### पालकांची जबाबदारी महत्त्वाची

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे आणि ही स्पर्धा प्रत्येक क्षेत्रात आहे. स्पर्धा म्हटले की यश-अपयश आलेच; मागोमाग तणाव आलाच. आज पालकांना आपली मुले प्रत्येक क्षेत्रात अव्वल असावीत असे वाटते आणि मग मुलांवर अपेक्षांचे ओझे लादले जाते. मात्र, अव्वल स्थानावर असण्याच्या नादात मुलांचे बालपण हरवून गेले आहे. खेळ मुलांच्या आयुष्यातून कालबाह्य झाले आहे. शाळा आणि विविध वर्गांसाठी मुलांना वेळ नाही. त्यामुळे शारीरिक आणि मानसिक विकास होण्यास आडकाठी निर्माण होते. यश आणि अपयश यांचा सामना करता यायला हवा आणि हे संस्कार मनावर लहानपणापासून व्हायला हवे. यशाने हुरळून जाऊ नये, अपयशाने खचून जाऊ नये इतके मार्गदर्शन पालकांनी केले तरी मुलांचे भविष्य चांगले होणार. जीवनात प्रत्येक क्षेत्रात काही उणे-अधिक राहणार. त्यासाठी मनाची तयारी केली पाहिजे. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, हे लक्षात घेऊन त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. कुठे चुकले त्याचा अभ्यास करून पुढच्या प्रयत्नात यश नक्की मिळेल, असा विश्वास त्यांच्या ठायी निर्माण व्हायला हवा. आज भ्रमणध्वनी, दूरदर्शन यासारख्या माध्यमांचा पगडा मुलांच्याच नव्हे तर पालकांच्या मनावरही आहे. याला वेळीच सांभाळले पाहिजे. मुले पालकांचे अनुकरण करतात. त्यांना सांगण्याआधी आपले वर्तन सुधारले पाहिजे. लहान लहान गोष्टीत आक्रस्ताळेपणा आणि अतिहट्ट घातक आहे, याचा परिणाम अत्यंत क्लेशदायक आहे. अपशब्द उच्चारणे, घरातून निघून जाणे, मारणे, हात उगारणे, अयोग्य वर्तन करणे, आत्महत्येचा प्रयत्न करणे यामुळे घराघरातील वातावरण काळजीचे झाले आहे. फक्त परीक्षा काळात मुलांकडे लक्ष देण्याऐवजी वर्षभर लक्ष देणे गरजेचे आहे. शाळा आणि घर यातून संस्कार केले जातात. अति शिस्त आणि त्यांचे दोषांवर लक्ष देताना मुलांची आवड लक्षात घेऊन तसे मार्गदर्शन केले तर आयुष्यात चांगले साध्य होईल. शिक्षक-पालक संवाद साधला जावा. यातून मुलांच्या प्रश्नांची उकल केली गेली पाहिजे. छंद, खेळ, वाचन, संगीत यातून ताणतणाव कमी करून मुलांच्या प्रगतीचा आलेख उंचावता येईल. मुले म्हणजे आपले आणि देशाचे भविष्य आहे. केवळ दहावी-बारावी परीक्षांचा निकाल हेच आयुष्य नाही. यशस्वी जीवनाचे अंतिम सूत्र नाही. मुलांना आणि पालकांना योग्य मार्गदर्शनाची नितांत गरज आहे.

**संगीता वाईकर** /९९२२५०४७९४



### मॉरिशस : एक सुखद अनुभव

हिंद महासागरातील आफ्रिकेच्या किनाऱ्यावर जवळपास दोन हजार किलोमीटर क्षेत्रामध्ये व्यापलेलं, अवघी १२,६६,५७३ लोकसंख्या असलेलं मॉरिशस हे एक बेट आहे. पोर्ट लुईस ही या देशाची राजधानी. इंग्रजी ही कार्यालयीन भाषा असून मुख्यत्वे फ्रेंच बेस्ड 'क्रिऑल' ही भाषा बोलली जाते. मॉरिशियन रूपी ही या देशाची करन्सी आहे. अशा या भौगोलिक इतिहास असलेल्या मॉरिशस बेटाला भेट देण्याचा योग जुळून आला. पोर्ट लुईसच्या दक्षिण-पूर्व दिशेकडे साधारणतः ४८ कि. मी. वर सर सिवुसागर रामगुलम या आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्याबरोबरच बेटामध्ये नांदणाऱ्या शांततेची जाणीव झाली. कुठेही गोंधळ नाही, गडबड नाही. येथे 'व्हिसा ऑन अरायव्हल' आहे. हॉटेल 'तमासा'मध्ये दाखल झाले. समुद्र किनारा लाभलेलं, अतिशय सुंदर हॉटेलचं खरंच अप्रूप वाटलं. हॉटेलचा स्टाफ अगदी नम्र. भारतीयसह बऱ्याच व्यंजनांचा आस्वाद दररोज घेता येत होता. सकाळी बसमधून निरनिराळ्या स्थळांना देणे हा नित्यक्रम होता. विविध पर्यटनस्थळे बघताना एक स्थळ विशेष आवडलं. आफ्रिकेमधील सर्वांत मोठं हिंदू धर्म असणारं हे राष्ट्र भगवान शिवाची उपासना मोठ्या भक्तिभावानं करतं. गंगा तलाव म्हणून प्रसिद्ध तलावाच्या काठी भगवान शिवाचं मंदिर दिमाखात उभं आहे. १०८ फूट उंचीची भगवान शिवाची व दुर्गा मातेची मूर्ती लक्ष वेधून घेतले. मार्च २०२५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी तिथे गेले होते. मोदींनी भारतामधील गंगेचं पाणी मॉरिशसमधील गंगा तलावात प्रवाहित केलं होतं, अशी माहिती तेथील स्थानिक गाईडने दिली. सौहार्दपूर्ण वातावरणात राजकीय सलोखा वृद्धिंगत करण्याचं कसब राजकारण्यांनी मोदींकडून शिकावं. असो, अशी ही मॉरिशसची संस्कृती बघून धन्य वाटलं. सात लाख वर्षांपूर्वी 'क्यूरपाईप' या शहराजवळ ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर आज त्या ठिकाणी सुंदर हिरवीगार झाडं बघताना आश्चर्यचकित व्हायला होतं. असा हा विविधतेने नटलेला देश बघायला एकदा तरी जरूर जावं.

**कीर्ती गाडगे** /९९२११९९९२२

### होळी (हुताशनी पौर्णिमा) सणामागील शास्त्र

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण देशभरात साजरा केला जातो. दुष्ट प्रवृत्ती आणि अमंगल विचार यांचा नाश करून सत्प्रवृत्तीचा मार्ग दाखवणारा उत्सव म्हणजे होळी. होळी सणाचे महत्त्व, सण साजरा करण्याची पद्धत याविषयीची शास्त्रीय माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. देशपरत्वे फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या पाच-सहा दिवसांत कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो. होळी सणाला अनेक समानार्थी शब्द असले, तरी 'वसंतोत्सव' अथवा 'वसंतागमनोत्सव' म्हणजे वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा करायचा उत्सव हे नावही देता येईल. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी झालेल्या पृथ्वीवरील प्रथम महायज्ञाची स्मृती म्हणून प्रत्येक वर्षी फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी सर्व भारतात 'होली' या नावाने यज्ञ होऊ लागले. विकारांची होळी करून जीवनात आनंदाची उधळण करायला शिकवणारा सण. 'विकारांची जळमटे जाळून टाकून नवीन उत्साहाने सत्त्वगुणाकडे जाण्यासाठी आम्ही सिद्ध आहोत' याचे जणू तो प्रतीकच आहे. राहिलेला सूक्ष्म-अहंकार होळीतील अग्नीत नाहीसा होतो. तो शुद्ध सात्त्विक होतो. त्यानंतर रंगपंचमी आनंदाची उधळण करत येते. आपले दोष, व्यसने आणि वाईट सवयी यांना घालवण्याची सुसंधी म्हणजे होळी आहे. सद्गुण ग्रहण करण्याची, अंगीकारण्याची संधी आहे. देशभरात सर्वत्र साजरा केला जाणाऱ्या 'होळी' या सणात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण उत्साहाने सहभागी होतात. सर्वसाधारणपणे देवळासमोर किंवा सोयीच्या ठिकाणी पौर्णिमेच्या सायंकाळी होळी पेटवायची असते. बहुधा ग्रामदेवतेसमोर होळी उभी केली जाते. श्री होलिकापूजनाचे स्थान शेणाने सारवून रांगोळी घालून सुशोभित करतात. मधोमध एरंड, माड, पोफळी अथवा ऊस उभा करतात. त्याच्या भोवती गोवऱ्या आणि सुकी लाकडे रचतात. घरातील कर्त्या पुरुषाने शुचिर्भूत होऊन आणि देशकालाचा उच्चार करून 'सकुटुम्बस्य मम ढुण्ढाराक्षसीप्रीत्यर्थं तत्पीडापरिहारार्थं होलिकापूजनमहं करिष्ये।' असा संकल्प करावा आणि नंतर पूजा करून नैवेद्य दाखवावा. त्यानंतर 'होलिकायै नमः।' म्हणून होळी पेटवावी. होळीला प्रदक्षिणा घालावी आणि पालथ्या हाताने बोंब मारावी. होळी पूर्ण जळल्यानंतर ती दूध-तूप शिंपडून शांत करावी. श्री होलिकादेवतेला पुरणपोळीचा नैवेद्य तसेच नारळ अर्पण करावा. मग जमलेल्यांना प्रसाद द्यावा. होलिकेची पूजा करताना म्हणायचा मंत्र-



'अस्माभिर्भयसन्त्रस्तैः कृता
त्वं होलिके यतः ।
अतस्त्वां पूजयिष्यामो भूते
भूतिप्रदा भव ॥'- स्मृतिकौस्तुभ

आयुर्वेदानुसार होळीचे लाभ - थंडीच्या दिवसांत शरीरात साठलेला कफ दोष होळीच्या काळात सूर्याच्या उष्णतेमुळे पातळ होतो आणि त्याच्यामुळे विकार उत्पन्न होतात. होळीच्या औषधी धुरामुळे कफ न्यून होण्यास साहाय्य होते. सूर्याच्या उष्णतेमुळे पित्त काही प्रमाणात वाढते. गाणे, हसणे आदींनी मन प्रसन्न होते आणि पित्त शांत होते. होळीच्या वेळी म्हटलेल्या रक्षोघ्न मंत्रांनी वाईट शक्तींचा त्रासही न्यून होतो, असे वैद्य मेघराज माधव पराडकर यांनी म्हटले आहे. धर्मविरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता पर्यावरणपूरक, अपप्रकार विरहित मात्र धर्मशास्त्र सुसंगत अशी होळी साजरी करा.

**विद्याधर जोशी** /९०११०८४४५०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.daniktarunbharat.com, epaper.daniktarunbharat.com

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**

**माजलगाव प्रतिनिधी** | म.शि.प्रसारक मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. के. मुळे होते. तर डॉ. एस के व्यवहारे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. एस. के. व्यवहारे म्हणाले की, दैनंदिन जीवनात विज्ञानाचे महत्त्व आहे. प्रगती साध्य करण्यासाठी प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी संशोधन आणि नवोपक्रमासाठी सतत सजग राहावे.

यावेळी डॉ. सुहास गवळी यांनी सी.व्ही. रमण यांच्या कार्यावर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ गणेश मोकासरे यांनी केले तर आभार डॉ नितीन ढवळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी- विद्यार्थिनी,प्राध्यापक उपस्थित होते.

# अजित दादा कर्ते सुधारक होते : कल्याण आखाडे

### अजित स्मृती व्याख्यानमालेला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

**बीड (प्रतिनिधी)** | महाराष्ट्राच्या राजकारणात अजित दादा पवार यांच्या सारखा नेता दुसरा होणार नाही. प्रत्येक बाबतीत त्यांचे वेगळेपण होते. राजकिय नेते बोलतात जास्त आणि कृती कमी करतात.अजित दादा हे पुर्णपणे कर्ते सुधारक होते. आपल्या राजकिय जीवनातला प्रत्येक क्षण त्यांनी कृती करण्यामध्येच घालवला. भाजपा प्रणित आघाडी सोबत जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर अजित दादा गेल्या तीन वर्षापासून स्वयंभू नेते झाले होते.त्यांनी स्वत:ला पुर्णपणे सिध्द केले होते. आता भविष्यात एकहाती राज्य मिळवण्यासाठी त्यांचे नेतृत्व तयार असतानाच त्यांची अकाली एक्झीट झाली अशी खंत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे स्टार प्रचारक कल्याण आखाडे यांनी व्यक्त केली.




महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने अजित स्मृती व्याख्यानमाला सुरु करण्यात आली आहे. अजित दादांचे निधन २८ तारखेला झाले. ही तारीख कायम लक्षात राहावी आणि त्या दिवशी दादांचे स्मरण व्हावे, त्यांच्या आठवणींचा जागर व्हावा या उद्देशाने प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला बीडमध्ये व्याख्यान होणार आहे. त्याची सुरुवात काल २८ फेब्रुवारी रोजी झाली. पहिले व्याख्यान कल्याण आखाडे यांचे झाले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर,लोकपत्रकार भागवत तावरे, पत्रकार संघाचे बीड शहर अध्यक्ष प्रतिक कांबळे, जेष्ठ नेते लक्ष्मणराव ढवळे आदि मान्यवर उपस्थित होते.

आखाडे यांनी आपल्या भाषणात अजित दादांच्या सर्वांगिण कलागुणांचा गौरव केला. दादा पश्चिम महाराष्ट्रात जन्मले असले तरी राज्याच्या प्रत्येक भागातील शेतकर्यांच्या प्रश्नांची जाण त्यांना होती. प्रश्न समजून घेवून त्याची उकल करणारे दादा एक प्रकारचे चालते बोलते लोक न्यायालयच होते. त्यांच्या दरबारात होणार्या प्रत्येक बैठकीतून लोकहिताचाच निर्णय होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांचे फक्त नाव न घेता त्यांचे विचार जगण्याचे काम दादांनी केले. त्यांच्या मंत्रीमंडळात नेहमी सर्व जाती, धर्मांना स्थान मिळाले. पक्ष संघटनेत सुध्दा दादांनी अष्टप्रधान मंडळा प्रमाणे रचना केली होती. त्यांच्याकडे अद्भुत अशी चुंबकिय शक्ती होती. ज्यामुळे त्यांच्याशी जोडला गेलेला व्यक्ती किंवा कार्यकर्ता पुन्हा त्यांच्यापासून दुर गेला नाही.दादा या नावाप्रमाणेच ते अनेकांचे आधार बनले होते. माझी राजकिय आणि सामाजिक जीवनाची सुरुवात कम्युनिस्ट विचारातून झाली. कॉ.अतहर बाबर यांच्या सोबत मी काम सुरु केले. त्यानंतरच्या काळात गोपीनाथराव मुंडे यांनी मला राजकिय साथ दिली आणि आता माझे संपुर्ण भविष्य अजित दादांच्या नेतृत्वावर अवलंबून होते. हे तीनही नेते आज हयात नाहीत याची खंत आखाडे यांनी बोलून दाखवली.

या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी अजित दादा पवार यांच्या कार्यशैलीचे वर्णन केले. बीडचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्विकारल्यानंतर हा जिल्हा आता बारामती प्रमाणे विकासाच्या बाबतीत पुढे जाईल असा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला होता. मात्र आता बीडकरांची घोर निराशा झाली आहे.प्रसिध्दी माध्यमांनी सुरुवातीचे अनेक वर्ष अजित दादांची प्रतिमा चुकीच्या पध्दतीने बनवली.मात्र गेल्या काही वर्षात स्वतंत्र भूमिका घेतल्यापासून दादांनी प्रत्येकाच्या मनात घर केले होते. त्यांची विनोदी शैली, प्रशासनातील दरारा,जनतेचे प्रश्न सोडवण्याची हातोटी यामुळे ते लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचले होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे महाराष्ट्र एका कर्तबगार मुख्यमंत्र्याला मुकला आहे असे मुंडे म्हणाले.

## विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती रुजविणे हा विज्ञान दिन साजरा करण्याचा मुख्य हेतू.- सुर्यकांत उजगरे

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | येथील श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात आज राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक विद्यालयाचे पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, विज्ञान विषय प्रमुख मनोज कराड, प्रमुख वक्त्या म्हणून जेष्ठ शिक्षीका वर्षा मुंडे ह्या उपस्थित होत्या.तर शास्त्रज्ञाच्या वेशभूषेत केदार चिंचोलकर,अभिमन्यू डोंगरे उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व सर सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.त्यानंतर मंचावरील मान्यवरांचे व विद्यालयातील सर्व विज्ञान शिक्षकांचे स्वागत करण्यात आले.त्यानंतर विविध शास्त्राज्ञांची माहिती वेदांत गित्ते,वैष्णवी देशपांडे यांनी दिली तर केदार चिंचोलकर,अभिमन्यू डोंगरे यांनी शास्त्रज्ञांचे वेशभूषेसह स्वमत व्यक्त केले. यावेळी भित्तीपत्रकांचे अनावरण करण्यात आले. प्रमुख वक्त्या वर्षा मुंडे मार्गदर्शन करताना म्हणाल्या की,विद्यार्थ्यां

मधील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास व्हावा याकरिता राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढावी याकरिता विज्ञान प्रदर्शनाचे आपण वेळोवेळी आयोजन करत असतो.विज्ञान तंत्रज्ञानामुळेच आज आपला देश प्रगतीपथावर आहे.विज्ञान तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आज आपला देश प्रगती करत आहे.

यावेळी प्रमुख उपस्थिती विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास होण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमात सहभागी घेतलाच पाहिजे. विज्ञान दिनानिमित्त शुभेच्छा देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी विज्ञानाचे प्रयोग करणे,प्रत्यक्ष कार्यक्रमात उपक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे म्हणाले की,विज्ञान हया विषयामुळे आपण विचारप्रवर्तक बनलो पाहिजेत. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी वाढविणे हे विज्ञान दिनाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.त्यादृष्टीने आपण विविध उपक्रमांचे आयोजन करत असतो. विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती रूजविण्यासाठी हा राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,विज्ञान विषय प्रमुख मनोज कराड,विज्ञान शिक्षक धनंजय जब्दे,नंदिनी कोदरकर व सर्व विज्ञान शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी व इ.८ ,९वी च्या विद्यार्थीनींनी परिश्रम घेतले.

## डॉ. रोहिणी थावरे यांचा रुग्णसेवेबद्दल गौरवपूर्ण सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**माजलगाव प्रतिनिधी** | येथील प्रसिद्ध फिजिओथेरपीस्ट डॉ. रोहिणी थावरे यांनी रुग्णसेवेच्या माध्यमातून मणक्याचे विविध आजार, सांधेदुखी तसेच अर्धांगवायूग्रस्त रुग्णांवर प्रभावी उपचार करून अनेकांना नवजीवन दिले आहे. आधुनिक फिजिओथेरपी तंत्रज्ञानाचा वापर, नियमित व्यायामपद्धती आणि समुपदेशन यांच्या साहाय्याने त्यांनी अनेक रुग्णांना वेदनामुक्त केले असून त्यांच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा घडवून आणली आहे.



विशेषतः मणक्याच्या विकारांमुळे त्रस्त असलेल्या रुग्णांना योग्य निदान व उपचार देऊन त्यांना शस्त्रक्रियेपासून वाचविण्यातही त्यांनी यश मिळविले आहे. अर्धांगवायू झालेल्या रुग्णांना पुन्हा चालण्यास, दैनंदिन कामे करण्यास सक्षम करण्यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे रुग्णांमध्ये आत्मविश्वास निर्माण होत असून त्यांचे आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होत आहे.

रा.कॉ. चे प्रदेश सरचिटणीस दयानंदजी स्वामी यांच्यावर यशस्वीपणे उपचार केल्यामुळे डॉ.थावरे यांचा दयानंदजी स्वामी यांच्या परिवाराच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

सत्कार स्वीकारताना डॉ. रोहिणी थावरे यांनी हा सन्मान सर्व रुग्ण व सहकाऱ्यांचा असल्याचे सांगून भविष्यातही अधिक तत्परतेने रुग्णसेवा करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## आरटीई पोर्टलवर ७५ शाळांचा समावेश करण्याची मागणी

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आलेल्या आणि त्यानंतर निर्णय रद्द झालेल्या ७५ शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुनः समावेश करण्यात यावा, अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, काही शाळांना अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्याच्या प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली होती. संबंधित शाळांच्या अल्पसंख्यांक दर्जाबाबत यापूर्वीच स्थगिती असतानाही काही तासांत प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणाची दखल घेत माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित निर्णयास स्थगिती दिली आहे. सध्या राज्यात आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू असून पालकांकडून अर्ज सादर केले जात आहेत. मात्र, नियमबाह्य पद्धतीने अल्पसंख्यांक प्रमाणपत्र देण्यात आलेल्या ७५ शाळांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आले आहेत. यात बीड जिल्ह्यातील पोद्दार शाळेचा देखील समावेश आहे. त्यामुळे या शाळेत आरटीई मार्फत आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांना अर्ज प्रक्रियेत अडचणी येत आहेत. अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे प्रवेशप्रक्रियेत नुकसान होत असल्याची बाबही पुढे आली आहे.

## इंडो-यूएस आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुकृपा फॉर्मसीच्या विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

**तभा वृत्तसेवा**

**माजलगाव (प्रतिनिधी)** | वे रिसर्च सोल्यूशन, विभा आयुर्वेदा वैद्य रिसर्च सेंटर व एंजल कॉलेज ऑफ फार्मसी पुणे, यांच्या तर्फे "इंडो-यूएस कॉन्फरन्स" या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. औषधनिर्मिती क्षेत्रातील संशोधन प्रक्रियेत झेब्राफिश या प्राणिमॉडेलचा वाढता वापर, त्याचे फायदे आणि भविष्यकालीन संधी यांवर सखोल चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती व त्याच बरोबर पोस्टर प्रेझेंटेशन आयोजन केले गेले. या परिषदेत विविध देशांतील तज्ज्ञ संशोधक, प्राध्यापक तसेच विद्यार्थी सहभागी झाले होते.



या परिषदेदरम्यान आयोजित आंतरराष्ट्रीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेत गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव येथील एम फॉर्मसी फार्माकोलॉजी विभागाचा विद्यार्थी प्रथमेश तानाजी मिसाळ याचा द्वितीय क्रमांक आला आहे. त्याने आपली गुणवत्ता सिद्ध करत दैदिप्यमान यश मिळवले.

प्रथमेशने ग्रीन केमिस्ट्री अप्रोच इन फार्मास्युटिकल रिसर्च या विषयात संशोधन सादर केले. या संशोधनासाठी त्याला गुरुकृपा फार्मसी येथील फार्मास्युटिक्सचे तज्ञ प्राध्यापक संग्राम गायकवाड यांचे गाईड व फार्मकोलॉजीचे विभाग प्रमुख डॉ. निखिल जाधव यांचे को-गाईड म्हणून मार्गदर्शन लाभले. प्रथमेश मिसाळच्या संशोधन सादरीकरणास परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. त्यांच्या या यशामुळे गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्वल झाले आहे.

या दैदिप्यमान यशाबद्दल गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संस्थेची शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील वाटचाल अधिक बळकट झाल्याचे मत व्यक्त केले. गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच प्राध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## शिवाजी महाराजांनी स्त्रियांना व उपेक्षितांना सन्मान दिला • व्याख्याते पिंजन सरकार

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पात्रुड येथे रक्तदान शिबिर व व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**माजलगाव** | छत्रपती शिवाजी महाराज धार्मिक होते परंतु अंधश्रद्धाळू नव्हते, त्यांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये पुरोगामीत्व अंगीकृत करून अनिष्ट चालीरीती,रुढींना बगल देऊन स्त्रियांना व उपेक्षितांना सन्मान देऊन त्यांना न्याय दिला व स्वाभिमान निर्माण करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले असे प्रसिद्ध पुणे येथील प्रसिद्ध व्याख्याते राकेश पिंजन सरकार यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील पात्रुड येथे छ. शिवाजी महाराज जयंती निमित्त रक्तदान शिबिर व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. सरपंच एकनाथ मस्के होते तर प्रसिद्ध व्याख्याते राकेश पिंजन सरकार प्रमुख मार्गदर्शक होते. प्रमुख पाहुणे म्हणून जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन चव्हाण पाटील, घनश्याम भुतडा, डॉ.वसीम मनसबदार, चेअरमन संतोष घुबडे, अनिकेत गायके, व्याख्याते बिडवे, डॉ. प्रकाश शिंदे, डॉ. अशोक घुबडे, विलास मामा मोरे, माऊली नाटकर, नवनाथ चाळक, बाळासाहेब बनकर, धनंजय काळे उपस्थित होते.



पुढे बोलताना पिंजण सरकार म्हणाले की, छ.शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांसाठी विशेष धोरण राबविले त्यांना अर्थसाह्य करून, शेतीला लागणारे अवजारे, बी बियाण्यांची उपलब्ध करून दिले, शिवाजी महाराजांच्या काळात राजेशाही असली तरीही स्वराज्य मध्ये लोकशाही प्रमाणे जनतेचे हित पाहिले गेले. असा इतिहासातील एकमेव दिलदार खुलेपणाने जगलेला राजा म्हणून शिवाजी महाराजांची ख्याती आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव साजरा करण्यासाठी अक्षय मोरे, ऋषिकेश नाटकर

> छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त पात्रुड येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. यामध्ये ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यामध्ये महिलांचा लक्षणीय सहभाग होता.

महाराज, विशाल जाधव, तुषार गायकवाड, सोमेश्वर राऊत, घाडगे ,शुभम राऊत, भिमराव काटे, अनिकेत चालक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गावातील व्याख्याते समर्थ राम नखाते पाटील यांनी केले तर प्रास्ताविक भागवत भुजबळ यांनी केले तर आभार पत्रकार प्रकाश यादव यांनी मानले.

## राज्यभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**बीड (प्रतिनिधी)** | देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे शुक्रवार, दिनांक २७ रोजी राज्यभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत ग्रंथ दिंडी काढून मराठी भाषेचा जागर केला. विद्यार्थ्यांनी विविध साहित्यिकांचे फोटो, घोषवाक्ये आणि मराठी भाषेचा गौरव करणारे फलक हातात घेऊन शाळा परिसरात उत्साहपूर्ण फेरी काढली. जय मराठी, माझी भाषा – माझा अभिमान अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध परंपरा आणि साहित्य वारसा याविषयी मनोगते व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांच्या कवितांचे प्रभावी वाचन करून उपस्थितांची मने जिंकली.

प्राचार्या उमा जगतकर यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेचे महत्त्व, तिची परंपरा व साहित्य वारसा यावर प्रकाश टाकला. मराठी ही आपल्या संस्कृतीचे प्रतीक असून विद्यार्थ्यांनी तिचा अभिमानाने वापर करून तिचा गौरव वाढवावा, असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योस्ताना राठोड तसेच शर्मिला मुंडे यांनी केले. आभार प्रदर्शन सहशिक्षिका ऋतुजा उगले यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबाजोगाई रोटरीच्या वतीने शीत शवपेटीचे लोकार्पण

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | अंबाजोगाईत उम्मीद ट्रस्ट संचलित जनसेवा हॉस्पिटलमध्ये रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने शीत शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले.

रोटरीच्या १२१ व्या वर्धापन दिनानिमित रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने उम्मीद ट्रस्ट संचलित जनसेवा हॉस्पिटलचे संचालक डॉ. तौफिकखान पठाण यांच्याकडे शीत शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी रोटरीचे प्रांत पब्लिक इमेज डायरेक्टर नीलेश वाईकर, पोलिस निरीक्षक शरद जोगदंड, रोटरीच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव मंजूषा जोशी, सहसचिव राधेश्याम लोहिया, प्रा. संतोष मोहिते पाटील आदी उपस्थित होते. १२१ व्या रोटरीच्या वर्धापन दिनी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रातील सहा. अभियंता सुभाष पसारे यांचा निरोप समारंभ संपन्न

### प्रभारी मुख्य अभियंता महेश महाजन यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**परळी प्रतिनिधी** | औष्णिक विद्युत केंद्र, परळी येथील कोळसा हाताळी विभागातील वाहन दुरुस्ती विभाग-१ चे सहाय्यक अभियंता सुभाष आनंदराव पसारे यांना २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात आयोजित सेवापूर्ती कार्यक्रमात निरोप देण्यात आला. श्री. पसारे यांनी परळी



येथे महाजनकोला एकूण २७ वर्षे सेवा दिली. त्यांना दोन मुले असून, त्यांचा मुलगा आदित्य याने बी.टेक. पूर्ण केले आहे. या सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा प्रभारी मुख्य अभियंता महेश महाजन यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या निरोप समारंभास प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे, अधीक्षक अभियंता सुरेश गर्जे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता शाहूराव होते, कार्यकारी अभियंता मदन पवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आरोले, उपकार्यकारी अभियंता शिवाजी होटकर, कुंदन राठोड, वाघ, तसेच मानव संसाधन विभागाचे महादेव वंजारे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी कोल्हापूर, पारस, भुसावळ आणि नागपूर या ठिकाणांहून त्यांचे मित्र व सहकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना महेश महाजन म्हणाले की, "प्रत्येकाने आपल्या कर्तव्यासोबतच सामाजिक आणि कौटुंबिक बांधिलकी जोपासली पाहिजे." प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यावेळी बोलताना म्हणाले की,

"माणुसकीचा भाव जोपासणारे तसेच खऱ्याला खरं आणि खोट्याला खोटं म्हणणारे, अशी सुभाष पसारे यांची ओळख होती."

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या जीवनप्रवासावर आधारित एक चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.

# सेनगाव तालुक्यातील विहीर घोटाळा प्रकरणी विभागीय चौकशीचे आदेश

## कागदावरच विहीरी दाखविण्याचा प्रताप भोवला, दोघांच्या सेवा समाप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ मार्च**

सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मंजूर विहीरींच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर सेनगाव पंचायत समितीतील तांत्रिक सहाय्यक के बी देशपांडे यांची उचलबांगडी करण्यात आली. तसेच त्यांच्या बेहिशेबी मालमत्तेची चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करावी अशी लेखी मागणी रामचंद्र शंकर खडसे यांनी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे केली आहे. तसेच या प्रकरणात तत्कालीन गटविकास अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, ग्रामसेवक यांच्या विरूध्द विभागीय चौकशीचे प्रस्ताव दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत तर दोघांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी शिवारात अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी ८५ विहीरी मंजूर झाल्या होत्या. मात्र त्यापैकी अनेक विहीरी प्रत्यक्षात अस्तित्वात नसतांनाही कागदोपत्री दाखवून लाखो रूपयांचा निधी काढल्याचा आरोप आहे. त्यानंतर गणेश रवणे, सयाबाई जगताप, इंदुबाई खडसे, एकनाथ कोल्हे, विठ्ठल वीरकर, श्रीराम जगताप यांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. प्रत्यक्ष अंमलबजावणीत त्रुटी, मस्टर नोंदीतील संशयास्पद नोंदी, आणि कामातील हलगर्जीपाण याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रारंभी रामचंद्र खडसे यांच्या शेतात विहीरीचे खोदकाम झाल्याचे दाखवून सुमारे २ लाख रूपयांची रक्कम मजूरांच्या खात्यात टाकून उचलण्यात आली आहे. मात्र या प्रकरणाच्या चौकशीमध्ये प्रत्यक्षात जागेवर कुठल्याही प्रकारचे खोदकाम झाले नाही. तसेच विहीर खोदल्याचे कुठल्याही प्रकारचे पुरावे जागेवर आढळून आले नाहीत. याबाबतचा अहवाल नायब तहसीलदार नकुल वाघुगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तांत्रिक अधिकारी के बी देशपांडे यांच्यासह सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वाकुडकर यांच्या सेवा समाप्त करण्याचे आदेश काढले आहेत. याशिवाय तत्कालीन गटविकास अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी व ग्रामरोजगार सेवक यांच्यावर गुन्हा दाखल करून अपहार झालेली रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. त्यावरून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाने यांनी तत्कालीन गटविकास अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, ग्रामसेवक यांच्या विभागीय चौकशीचे प्रस्ताव तयार करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

# कहाकर बु. येथे दोन भव्य सभामंडपाचे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचेहस्ते लोकार्पण

## आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पुढाकारातून बांधकाम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ मार्च**

सेनगाव तालुक्यातील कहाकर बु. येथील श्री हनुमान महाराज व व श्री संत गजानन महाराज संस्थान येथील नवीन सभागृहाचे उद्घाटन राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार तान्हाजीराव मुटकुळे हे होते तर प्रमुख पाहुणे भाजपा जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजानन घुगे, माजी आमदार रामराव वडकुते, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शासकीय गुत्तेदार कैलास बुळे, के.के. शिंदे, संजय कावडे, सोपान महाराज शास्त्री आदींची प्रमुख उपस्थिती होती. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधीतून या सभामंडपाचे व सभागृहाचे भव्य काम करण्यात आले आहे.

कहाकर बु. येथे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक विकास निधीतून १ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. कहाकर बु येथे भव्य सभामंडप तयार करण्यात आला असून या सभामंडपाचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बोलतांना राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधीतून मतदारसंघात अनेक ठिकाणी सभागृह, सभामंडप तसेच रस्ते आणि इतर विकास कामे केल्याबद्दल त्यांच कौतुक केले.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी बोलतांना सांगितले की, मतदारसंघातील विकासासाठी मी कटीबध्द असून मतदारसंघात सिंचन, पाणी, रस्ते, वीज तसेच इतर विकास कामांसाठी निधी कधीही कमी पडू देणार नाही. यावेळी भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर दुपारी २ वाजता भव्य किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. किर्तनकार श्री ह.भ.प. सोपान महाराज शास्त्री यांनी किर्तन केले. यावेळी मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील महिला पुरुष व भाविक उपस्थित होते.

# गुन्ह्यातील हस्तगत मुद्देमाल फिर्यादींना सन्मानपूर्वक परत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ मार्च**

जिल्हा घटकातील सर्व पोलिस ठाणेस्तरावर गुन्ह्यात आरोपीकडून हस्तगत केलेला मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याबाबत मोहीम दि २८ फेब्रुवारी रोजी राबविण्यात आली. यावेळी ५३ लाख ६१ हजार ७२० रूपयांचा मुद्देमाल पोलिस विभागाने सन्मानपूर्वक परत केला आहे. या मोहीमेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाणे स्तरावर गुन्ह्यातील आरोपींकडून हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमाल फिर्यादींना परत करण्यात येत आहे. दि २८ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यात ही मोहीम राबविण्यात आली. जिल्ह्यातील एकूण ६ गुन्ह्यातील सोन्या चांदीचे दागिने, नगदी असे किंमती ३६ लाख ७६ हजार ७२० रूपये, ४ वाहने किंमत १ लाख ८० हजार, मोबाईल किंमत १५ लाख ५ हजार असा एकूण ५३ लाख ६१ हजार ७२० रूपयांचा मुद्देमाल माहे फेब्रुवारी महिन्यात फिर्यादींना परत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, जमादार प्रेमदास चव्हाण, सर्व पोलिस ठाणे प्रभारी, मुद्देमाल मोहरील, सायबर सेलचे अधिकारी, कर्मचारी यांनी बजावली आहे.



**हिंगोली– शहरातील हॉटेल द्वारका येथील सभागृहात शनिवारी भारतीय जनता पक्षाच्यावतीने पंडीत दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संघटनमंत्री तथा प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिक्षणाधिकारी भागवत यांचा सत्कार



हिंगोली– माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी विपुल भागवत यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्विकारला आहे. यानिमित्त कै. ग्यानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थेचे सचिव पंडित शिरसाट, उपाध्यक्ष संजयसिंह गहेरवार, कार्याध्यक्ष सुधाकर मेटकर यांनी संस्थेच्या वतीने शिक्षणाधिकारी विपुल भागवत यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी राजे संभाजी महाविद्यालय प्राचार्य उमेश शेळके, राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन मुख्याध्यापक सुधाकर बल्लाळ, शिवशंकर डोल्हारे, श्रीकांत कान्हेड, शशिकांत बोरकर आदींची उपस्थिती होती.

### आदर्शमध्ये मराठी भाषा दिन साजरा



हिंगोली– आदर्श महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज जयंती व मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य प्रो.डॉ. विलास आघाव यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून डॉ. सुरेश लेकुळे यांनी ज्ञानपीठ विजेते कवी कुसुमाग्रजांच्या वाङ् मयीन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भाषिक कौशल्य आत्मसात करावीत, व्यक्तिमत्व विकास साधावा तसेच मराठी भाषेचा अभिमान बाळगावा असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमासाठी ग्रंथपाल प्रा. ज्योती शंकपाळे, प्रा. गजानन डुडुळे, प्रा. नारायण कापुरे, प्रा. रुपेश जरांडे, प्रा.अमरनाथ जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश मंगनाळे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन डॉ.मारोती कोल्हे यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

### १९ वाहनांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १९ वाहन चालकांवर पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून १९ हजार ५०० रूपयांचा दंड वसुल केला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत जिल्ह्यात २९ ठिकाणी पोलिसांनी छापे मारून मुद्देमाल जप्त करीत संबंधितावर गुन्हे दाखल केले आहेत.

# ग्रंथोत्सवात रंगले बहारदार कवीसंमेलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ मार्च**



ग्रंथ महोत्सवात ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडून खुले कविसंमेलन आयोजित केले होते. त्यात पन्नास ते साठ कवी कवयीत्रीनी उपस्थिती लावली होती. या कविसंमेलनात अध्यक्ष म्हणून सौ. सिंधूताई दहिफळे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून खंडेराव सरनाईक, प्रसिद्ध साहित्यिक वैद्य सर,हास्य कवी सुरासे उपस्थित होते. मंचावर ग्रंथ अधिकारी ढोक, ससे उपस्थित होते. या कविसंमेलनात रान कवी राजकुमार नायक यांनी बहारदार सुत्रसंचलनाने रंगत आणली यात सौ. कल्याणकर, ज्येष्ठ कवी बबन मोरे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर आसूड ओढले. कवी समाधान लोणकर यांनी भिडेवाड्याचे कवितेतून जळजळीत वास्तव मांडले. राजकुमार मोरगे यांनी भावा भावाची वाटणी या कवितेतून सध्याचे वास्तव मांडले, कवी विलास भालेराव यांनी माणसांच्या वेशात पशूंचा स्वभाव आहे ही कविता सादर केली.कवी गुंडेकर यांनी शिवजयंती वर सुंदर कविता सादर केली. कवी राजकुमार नायक यांनी शेतकरी आत्महत्त्येवर वास्तव कविता सादर केली. डॉ.निखिल नायक आठवण ही कविता सादर केली तर अध्यक्ष म्हणून सिंधूताई दहिफळे यांनी आपण हिंदू मुस्लिम करायचं नाही ही सामाजिक बांधिलकी जपणारी कविता सादर केली.यात पूजा मेटे, दादाराव जाधव, मस्के ताई, गणपत माखणे, बालाजी शेळके, ज्ञानदा चौधरी, ज्योती पतिंगराव, संदीप पाटील गोरेगावकर, सुधाकर मोरे, कैलास कावरखे, महासेन प्रधान, आयुष गुप्ता,गंगाधर हरणे,गजानन मेटकर, शिवदास पोटे, आबा पांचाळ, मदन अंभोरे, बालिका बरगळ, शिवाजी कऱ्हाळे, अनिकेत देशमुख यांच्यासह पन्नास ते साठ कवी उपस्थित होते. या कविसंमेलनास मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित होते.

# राज्यशासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची चित्र रथाद्वारे जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ मार्च**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२०२६ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी विविध योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

आज हिंगोली जिल्ह्यातील येहळेगाव, खंडाळा, राजुरा, पहेनी, नांदापूर, सोडेगाव, दिग्रस कऱ्हाळे व सालेगाव आदी गावामध्ये चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यात आली. या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मतदार यादी दुरूस्ती कामात निष्काळजीपणा करणाऱ्या ८ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ मार्च**

हिंगोली तालुक्यामध्ये मतदार यादी दुरूस्ती तसेच एसआयआर अंतर्गत कामाच्या पूर्वतयारीमध्ये वारंवार सूचना देऊनही गैरहजर राहणाऱ्या तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या आठ शिक्षकांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तहसील कार्यालयाच्यावतीने तालुक्यामध्ये दि २९ आक्टोबर २०२५ ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये मतदार यादीची दुरूस्ती तसेच एसआयआर अंतर्गत पूर्वतयारी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यासाठी तालुक्यामध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र यासाठी आयोजित बैठकांसाठी तसेच कामासाठी शिक्षकांना तहसील कार्यालयात हजर राहण्याबाबत कळविण्यात आले होते मात्र आठ शिक्षक गैरहजर राहीले होते.

या प्रकारामुळे तहसील कार्यालयाने आठ शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती तसेच त्यांना तहसील कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत भ्रमणध्वनीवरून संपर्क साध्यात आला होता मात्र त्यानंतरही शिक्षक उपस्थित झालेच नाहीत. याप्रकरणी नायब तहसीलदार मंगला मोरे यांनी शनिवारी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी कनेरगावनाका जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक रघुनाथ भारती, नर्सी प्राथमिक शाळेचे शिक्षक नागेश जाधव, विठ्ठल कामखेडे, भारत प्राथमिक विद्यालयाचे शिक्षक शिवाजी राठोड, संभाजी माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक प्रल्हाद कोटकर, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक पांडुरंग हाळसे, खानापूरच्या विद्यासागर विद्यालयाचे शिक्षक सतीश तायडे, बळसोंड जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक सतीश नवले या शिक्षकांविरूध्द लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जमादार पोटे, अशोक धामणे, संजय मार्के हे पुढील तपास करीत आहेत.

# सेनगाव पोलिसांनी लुटलेला मुद्देमाल सराफ्यास केला परत, मानले आभार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ मार्च**

सोनार नामे सुरेश संभाजी खंदारकर यांनी विविध बँका कडुन तसेच बचत गटातुन छोटी-छोटी रक्कम लोन स्वरूपात व हात उसणे घेवुन मागील पाच वर्षापुर्वी २० ग्रॅम सोने व काही चांदीचे दागिने खरेदी करून मौजे रायवाडी व मौजे कापडसींगी येथे मासिक १००० रूपये भाडयाने खोली घेवुन छोटेसे सोन्या चांदीचे दुकान चालवुन आपली उपजिवीका भागवत होते. त्यांनी दि.३०.०१.२०२६ रोजी मौजे कापडींगी येथील दुकानावर दोन तास व्यापार करून सायंकाळी चार वाजण्याचे सुमारास दुकानातील सोन्याचांदीचे दागिने घेवुन त्यांचे मोटार सायकलने लोणारकडे जात असतांना एका मोटार सायकलवर अनोळखी तिन इसमांनी सोनाराचा पाठलाग करून मोटार सायकल खाली पाडुन सोनारास चाकुचा धाक दाखवुन सोनारा जवळील आतापर्यंत कमवलेले ११४ ग्रॅम सोने व ३६०० ग्रॅम चांदीचे दागीने, मोबाईल, रोख रक्कम असा ३० लाखाचा मुद्देमाल बळजबरीने लुटल्यासंदर्भाने सेनगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मागील पाच वर्षाची मेहनतीची कमाई एका क्षणात लुटुन दररोजची रोजी रोटी दुकान बंद पडल्याने फिर्यादी सोनार हताश झाला होता.

सदर गुन्हयासंदर्भाने जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी सदर गुन्हयाचा छडा लावण्याबाबत पोलीस निरीक्षक मोहन भोसले, स्थानिक गुन्हे शाखा, हिंगोली व सपोनि. पो. स्टे. सेनगाव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने सपोनि. शिवसांब घेवारे, पोउपनि. दिलीप मोरे, स्था.गु.शा. व सपोनि. दिपक मस्के, पोउपनि. रविकिरण खंदारे, पो.स्टे. सेनगाव यांचे पथक समांतर तपास करून अवघ्या ४८ तासात सदर गुन्हयाचा उलघडा करून सहा दरोडेखारास ताब्यात घेवुन चोरी गेलेला संपुर्ण मुददेमाल जप्त करण्यात आला.

तसेच सदर दरोडेखोराकडुन जप्त केलेला मुददेमाल हे कायदेशीर प्रक्रीया लवकरात लवकर पुर्ण करून फिर्यादीस परत देवुन फिर्यादीचे बंद पडलेले दुकान हे पुन्हा लवकरात लवकर चालु होईल या अनुषंगाने पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन हे तपास पथकास सुचना देत होते त्याअनुषंगाने दि २७.०२.२०२६ रोजी फिर्यादीस अगदी कमी कालावधीत फिर्यादीस दरोडेखोरांनी लुटलेला संपुर्ण ३० लाखाचा मुददेमाल परत करून त्यांना पुन्हा व्यापार करण्यासाठी हिंगोली पोलीसांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

# लोहगावात 'रेंज'चा खेळखंडोबा; नागरिक हैराण

**भा वृतसेवा**
**रसी, दि. २ मार्च-**

येथून जवळच असलेल्या लोहगाव ता. बिलोली, जि. नांदेड) येथे मोबाईल टवर्कच्या गंभीर समस्येमुळे नागरिक अक्षरशः स्त झाले आहेत. विशेषतः ठशश्रळरपलश ळे च्या सेवांबाबत गावकऱ्यांमध्ये तीव्र राजी व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांपासून गावात वीज ली की नेटवर्क गायब होणे हा नित्याचा कार होता; मात्र मागील वर्षभरापासून रिस्थिती आणखी बिकट झाली आहे. ताता वीज सुरू असतानाही नेटवर्क राहत सल्याची तक्रार नागरिक करत आहेत. ीज गेल्यानंतर जनरेटरची कोणतीही पर्यायी ुविधा उपलब्ध नसल्याने संपूर्ण गाव



संपर्कविहीन होते.

या नेटवर्क अडचणीमुळे गंभीर परिणाम समोर आले आहेत. अपघाताच्या प्रसंगी घरच्यांना संपर्क करता न आल्याने जखमींना वेळेवर रुग्णालयात हलवता आले नाही, परिणामी काहींचा मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. रेंज नसल्यामुळे जीव गेला, याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल गावकरी उपस्थित करत आहेत.

गावात सुमारे दहा ते बारा हजार जिओ सिमकार्डधारक ग्राहक असूनही कंपनीकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप आहे. वारंवार तक्रारी करून, प्रत्यक्ष भेटी देऊनही परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. त्यामुळे अनेकांनी जिओ सेवा बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

मोबाईल नेटवर्क नसल्याने व्यावसायिक व्यवहारांनाही मोठा फटका बसत आहे. डिजिटल व्यवहारांसाठी वापरले जाणारे फोन पे आणि गुगल पे हे ॲप्स चालत नसल्याने दुकानदार व ग्राहक दोघांचेही व्यवहार ठप्प होतात. रुग्णालयीन कामकाज, शासकीय व्यवहार आणि इतर अत्यावश्यक सेवांमध्येही मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण होत आहेत.

लोहगावातील नागरिकांनी आता एकमुखाने मागणी केली आहे की, जिओ कंपनीने तातडीने तांत्रिक पथक पाठवून नेटवर्क समस्या कायमस्वरूपी सोडवावी, जनरेटरची सुविधा उपलब्ध करून द्यावी आणि गावकऱ्यांचा विश्वास पुन्हा जिंकावा. अन्यथा मोठ्या प्रमाणात ग्राहक गमावण्याची वेळ कंपनीवर येऊ शकते, असा इशाराही देण्यात येत आहे.

# हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटारपंप केबल चोरांचा हैदोस

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २ मार्च-**

हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत विद्यूतपंप मोटारीचे केबल चोरीच्या घटना सातत्याने गेल्या दोन महिण्यापासून घडत आहेत. अनेक शेतकर्यानी हिमायतनगर पोलीस ठाणे गाठून लेखी स्वरूपात तक्रारी दाखल केल्या आहेत. परंतू एकाही तक्रारीचा निवाडा अर्थात तपास स्थानिक पोलीसांनी लावला नाही. चोरीच्या घटना मात्र सातत्याने घडतच आहेत. केबल चोरीच्या घटनांनी शेतकरी प्रचंड मनस्ताप व्यक्त करीत असून, स्थानिक पोलीसांच्या भुमिकेवर मात्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तालूक्यातील कारला, पिछोंडी, मंगरूळ, वारंगटाकळी, सिरपल्ली, शेल्लोडा, एकंबा, कौठा ज. सह पैनगंगा नदीकाठावरील जवळपास सर्वच ठिकाणी विद्यूतमोटारीचे केबल चोरीला गेले आहेत. चोरटे या भागात सक्रिय झाले आहेत. अनेक शेतकर्यानी आपली कैफियत अर्ज देवून हिमायतनगर पोलीसांकडे मांडली आहे. परंतू मांडवलीत अग्रेसर असलेल्या पोलीसांनी एकाही गुन्हयाचा तपास लावला नाही. परिणामी चोरट्याचे मनोबल वाढले आहे. गेल्या खरिप हंगामात विक्रमी पद्धतीने सर्वच पिकांच्या उत्पादनात घट निर्माण झाली असल्याने, रब्बी हंगामावर तरी कशी तरी भरपाई होईल,या आशेने शेतकरी आपल्या पिकाला जिवापाड जपत पाणी पुरविण्याचे काम करीत आहेत. परंतू शेतकर्याच्या या चांगल्या कामात चोरट्यांनी खोडा घातला आहे. रात्रीतून केबल कापून नेत असल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. चोरट्याचा तपास लावण्यात पोलीस स्पेशल अयशस्वी ठरत असल्याने स्थानिक पोलीसांच्या कामगीरीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत असून जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक अविनाशकुमार यांनी याबाबींकडे तात्काळ लक्ष पुरवून एका विशेष पथकाच्या निर्मितीतून केबल चोरांचा शोध घेवून तपास लावून शेतकर्याना दिलासा द्यावा. अशी मागणी शेतकर्यातून पुढे आली आहे.





## मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञानप्रदर्शन आणि आनंदनगरीचा कार्यक्रम

**उमरी-**येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त विज्ञान प्रदर्शन आणि आनंदनगरीचा कार्यक्रम दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाला. उमरी पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक जयप्रकाश गुटे यांचे हस्ते उपरोक्त प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.प्रमुख पाहूणे म्हणून ग्रामीण रुग्णालय उमरीतील वैद्यकिय अधिकारी डॉ. मारोती चंदापुरे आणि उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी हे होते. विज्ञान प्रदर्शनात नर्सरी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक्स ,पर्यावरण विषयक ,कचरा व्यवस्थापन,रोबोट,स्वसरंक्षण असे विविध प्रकल्प बनवले होते. आनंदनगरीमध्ये विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण पाककृती आणून सर्वना तृप्त केले, या प्रसंगी शाळेतून विमानवारी साठी प्राप्त ठरलेल्या गौरी शिंदे आणि पुढील शिक्षणासाठी परदेशात जात असलेल्या अश्विका चंदापुरे या गुणवंत विद्यार्थिनीचा सत्कार प्रमुख अतिथींच्या हस्तेकरण्यात आला. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी, सौ. सायली अपसिंगेकर, सौ. सानिका सराफ आणि सर्व सहकारी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. वरील दोन्ही कार्यक्रमाचे पालकांनी कौतुक केले.

## जिल्हा परिषद प्रा.शाळा महाताळा येथे इ.पाचवीच्या स्वयंशासन दिन सोहळा

**निवघा बा-**निवघा तळणी सर्कल मधीलमहाताळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळाच्या वतीने इ.पाचवी वर्गातील विद्यार्थी,



विद्यार्थिनी यांचा, स्वयंशासन दिन सोहळा दि.२७ फेब्रुवारी रोजी पार पडला. इ.पाचव्या वर्गातील विद्यार्थ्यांनी कु. जान्हवी संतोष शिंदे ही मुखध्यापक पदी तर कु. तुकाराम ज्ञानेश्वर सुर्यवंशी ह्यांची पर्यवेक्षक पदी नेमणूक करण्यात आली तसेच सहशिक्षक म्हणून सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमासाठी महाताळा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक सन्माननीय राजीव सावरकर सर तसेच वर्षा भोळे मॅडम, विनोद खेडकर आणि निशिगंधा म्हेत्रजकर यांच्या यांच मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## लतिफ पठाण यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव

**नांदेड-**जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहायक लतिफ इमामखान पठाण शनिवार दिनांक २८ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत झाले. यानिमित्ताने महसूल परिवाराचेवतीने निवासी उपजिल्हाधिकारी



किरण अंबेकर यांचे हस्ते शाल, भेटवस्तू देऊन पठाण दांपत्याचा गौरव करण्यात आला. यावेळी तहसीलदार शंकर लाड, उषा इज्जपवार, भगवान हंबर्डे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद मालशेटवार, डॉ.अनिल पोपुलवार, डॉ.पतंगे, किशोर कुन्हे, नीरज धामणगावे उपस्थित होते. प्रीती डहाळे, संदीप ढवळे यांनी पीपीटी सादरीकरणातून तर डॉ. स्वाती अलोने, रोशनसिंग ग्रंथी, प्रकाश कांबळे, सोपान गुंडाळे, बारकुजी मोरे, बालाजी जाधव यांनी मनोगतातून पठाण यांचा सेवाकाळ मांडला. प्रास्ताविक प्रसाद शिरपूरकर आभार सिद्धार्थ बुक्करे यांनी तर सूत्रसंचालन बालासाहेब भराडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी नागरीक प्रतिनिधी बी. जी. मोरे यांचेसह विविध विभागातील अधिकारी कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## संत विचारांच्या प्रकाशात टाकळगावात हरिनामाचा अखंड महायज्ञ

**नायगाव-**टाकळगाव येथे २ ते ९ मार्च २०२६ दरम्यान २९ वा अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मोठ्या भक्तिभावात सुरू आहे. फाल्गुन शुद्ध चतुर्दशीला प्रारंभ झालेल्या या सप्ताहात दररोज



विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले आहे. सप्ताहाची सुरुवात पहाटे काकडा आरतीने होते. त्यानंतर सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन तर दुपारी प्रवचनांचा कार्यक्रम होत आहे. सायंकाळी हरिपाठ व रात्री हरिकीर्तनाने वातावरण अधिकच भक्तिमय बनत आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या विचारांनी प्रेरित पारायणामुळे अध्यात्मिक चिंतनाची अनुभूती भाविकांना मिळत आहे. विविध ह.भ.प. महाराजांच्या कीर्तनसेवेने सप्ताहात रंगत वाढली असून पंचक्रोशीतील भजनी मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे. ग्रामस्थांनी नाश्ता, भोजन व भंडाऱ्याची जबाबदारी स्वीकारून सेवाभाव जपला आहे. महिला मंडळे व युवकांनीही नियोजनात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. ९ मार्च रोजी काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसाद वितरणाने सप्ताहाची सांगता होणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे. सप्ताहामुळे टाकळगावात सामाजिक ऐक्य, भक्ती आणि संस्कृतीचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे.

# माळटेकडी रोडवरील हैदरबाग गल्ली मधील लोखंडी कमान हटवा : बशीर लाला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ मार्च-**

शहरातील माळटेकडी रोडवरील हैदरबाग गल्ली नं. २ मध्ये विनाकारण लोखंडी कमान बसविण्यात आली आहे. या लोखंडी कमानीमुळे अंत्ययात्रा नेतांना मोठी कसरत करावी लागत आहे, तर रुग्णवाहिका देखील नेता येत नसल्याने मोठी अडचण होत असुन ही कमान तातडीने हटवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शेख बशीर लाला यांनी एका निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांकडे केली आहे.

ही कमान मनपाने नाही तर तेथील एक-दोघांनी विनापरवानगी बसवलेल असुन या लोखंडी कमानीमुळे अंत्ययात्रा नेतांना मोठी कसरत करावी लागत आहे, तर रुग्णवाहिका देखील नेता येत नसल्याने मोठी अडचण होत आहे. देगलूर नाका येथे वाहतुकीची कोंडी होत असल्याने रुग्णालयात जाण्याचा हा जवळचा आणि रहदारीमुक्त रस्ता असल्याने या रस्त्याचा वापर करण्यात येतो. परंतु लोखंडी



कमानीमुळे रुग्णवाहीका, स्कुल बसेस जाण्यास अडचण होत असून, ही कमान तातडीने हटवावी तसेच या रस्त्यावर जवळपास २० गतिरोधक विनापरवानगी टाकण्यात आले आहेत. तर याच मार्गावरील दुसऱ्या गल्लीत माय फिटनेस जिम नावाने जिम सुरु करण्यात आली आहे. परंतु जिम मालकाने पार्किंगची कुठलीही व्यवस्था केली नाही. जिममध्ये येणारे सदस्यांच्या दुतर्फा वाहने लावत असल्याने वाहतुकीची कोंडी होत असून विशेष करुन शाळकरी विद्यार्थ्यांना, रुग्णवाहीका जाण्यास अडचण होत असुन, ही जिम देखील बंद करावी असेही शेख बशीर लाला यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा शिवाय पर्याय नाही : सुधीर गुट्टे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २ मार्च-**

भविष्यात मोठे अधिकारी व्हायचे असेल तर विद्यार्थीनी नेहमी स्पर्धा परिक्षेची तयारी करून सहभागी होयायला तत्पर आसले पाहीजेत असे आवाहन गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड सुधीर गुट्टे यांनी जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे आयोजित एनएनएमएस परिक्षेत ऊर्तिण विध्यार्थी सत्कार सोहळा प्रसंगी केले.

जिल्हा परिषद हायस्कूल येथे दिनांक २८फेब्रुवारी रोजी,भारतात दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय भौतिक शास्त्रज्ञ प्रो.सी.व्ही.रमन यांनी रमन इफेक्ट या शोधाची घोषणा केली होती. यासाठी त्यांना १९३० मध्ये भारतात पहिले नोबल पारितोषिक मिळाले. वैज्ञानिक जागरूकता वाढवण्यासाठी आणि विज्ञानाचे महत्त्व सांगण्या साठी, हा दिवस साजरा केला जातो.यावेळी

पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल



विष्णुपुरी येथील शाळेतील इयत्ता आठवीच्या ५७ पैकी ४५ विद्यार्थ्यांनी एन. एन.एम.एस म्हणजेच (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षा ) या परीक्षेत घवघवीत यश मिळून शाळेच्या आणि गावाचं नाव लौकिक केल्या बद्दल विज्ञान दिनाचे औचित्य साधून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी गट शिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, या शंकरराव हंबर्डे,सरपंच सौ. संध्याताई विलासराव हंबर्डे, पालक प्रतिनिधी,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य राजेश बालाजीराव हंबर्डे,भास्कर हंबर्डे,शिलानंद सोनकांबळे, गावातील प्रतिष्ठित नागरिक व शिक्षण विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे, विकास मोरे,विषय तज्ञ मारुती ढगे , सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका अनुजा पवार यांनी केले,तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका उज्वलाताई जाधव यांनी केले.


# न्यु इरा किड्स इंग्लिश स्कुलमध्ये विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ मार्च-**

अर्धापूर शहरातील एज्युव्हिजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये २८ फेब्रुवारी २०२६ रोजी जागतिक विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री पांडुरंग बोबडे सर, तर प्रमुख पाहुणे म्हणून सखाराम क्षीरसागर, श्री नागेश खरसकर यांची उपस्थिती होती. आजच्या विज्ञान प्रदर्शनाचे विशेष म्हणजे शाळेतील एकूण ११० विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या मधील असणाऱ्या कलागुणांचे सादरीकरण केले आहे. स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना टिकवण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी शाळेने भव्य अशा विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते.

शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शनाची स्पर्धा ही तीन गटांमध्ये घेण्यात आलेली असून यामध्ये प्रथम क्रमांक कु.मनस्वी कवडे, कु. सिद्धी गोमासे कु.रिया अंधारे तर द्वितीय क्रमांक कु.समीक्षा



देशमुख, कु.दृष्टी घोडेकर कु.आरोही पवार आणि तिसऱ्या क्रमांक कु.आराध्या कोपरे, कु.स्पर्शिका खरसकर, शिवांश पतंगे यांनी मिळवला.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शिक्षिका रोहिणी शिंदे,कोमल डांगे,स्वाती कवडे,स्वाती पांचाळ, शिवराणी पत्रे, किरण क्षीरसागर, अल्का धुमाळ, ममता हट्टेकर,बी विजयकृष्णा, मनीषा सिंग, शांतून सिंग, दत्ता उपरे, आशुतोष पुरी सेविका अर्चना रसवंते,कविता गाडेकर,विजय पवार यांनी परिश्रम घेतले

कार्यक्रम यशस्वीरित्या घडवून आणल्याबद्दल शाळेचे संचालक प्रवीण रावते तसेच प्राचार्य प्रिया रावते संस्थेचे अध्यक्ष रेखाताई रावते संस्थेचे उपाध्यक्ष अभिषेक गुरखेल यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले

# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्हा राज्यात पाचवा, विभागात प्रथम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ मार्च-**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२६ अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय मानांकनात नांदेड जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या मानांकनात नांदेड जिल्ह्याने राज्यात पाचवा क्रमांक, तर लातूर विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. अवघ्या काही गुणांच्या फरकामुळे राज्यातील पहिल्या तीन जिल्ह्यांमध्ये स्थान मिळू शकले नसले तरी नांदेडची कामगिरी राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये गणली गेली आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

शासकीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामीण व दुर्गम भागांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविणे, तसेच सेवा गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव म्हणून हे मानांकन देण्यात येते.

जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित आढावा बैठका घेऊन प्रभावी नियोजन करण्यात आले.

उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्ह्यातील वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, क्षयरोग विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच आरोग्य विभागातील सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य केले. या संयुक्त प्रयत्नांतूनच हे यश संपादन झाले असल्याची माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी दिली.

# रानोमाळ घनगर्द केशरी फुलांनी लदबदला पळस

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २ मार्च-**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूरसह भागातील काही गावच्या माळरानावरील केशरी,लाल फुलांनी बहरलेला पळस सर्वांचे आपसूक लक्ष वेधून

घेत आहे.भर उन्हात फुलांच्या ताटव्यांनी लदबदलेल्या पळसाला पाहिल्यावर मन शीतल आणि मनाला उत्तुंग उभारी मिळते!

थंडी ओसरता वसंतात रानाशिवारी आणि माळराणी पानझड झाल्याने उघडी बोडकी झाडे नव्या पालवीने बाळसे धरतात.वसंताचा हंगाम लागतो आणि पळसफुलांनी डोळ्यांना आल्हाददायक अनुभव प्रत्ययास येतो!वातावरणात चैतन्य निर्माण होते.वसंत ऋतू माघ आणि फाल्गुन या दोन मराठी महिन्यात सुरू होतो. वातावरण बदलामुळे सकाळी हुडहुडणारी थंडी आणि दुपारी उन असाही अनुभव मानवास मिळतो आहे. गुढीपाडवा,रामनवमी,शिमगा ,रंगपंचमीचा सणही जवळ येतो आहे.ग्रामीण भागात पळसाच्या फुलांचा पारंपरिक रंग आताही तयार करतात.त्याचबरोबर पळसाला आयुर्वेदिक औषधी वनस्पती म्हणूनही उपयोगात आणले जाते.अनेक मानवी उपचार त्याने बरे होतात.

पळसाला 'फ्लेम ऑफ द फॉरेस्ट' असे नामाभिधान प्राप्त झाले आहे.रानीवनी, डोंगरझाडीत,दऱ्या-खोऱ्यात केशरी,लाल पागोऱ्यांनी अवचित नटलेला पळस पाहून सर्वसामान्यांसह



निसर्गप्रेमी माणूस भारावल्याशिवाय कसा राहील!हा निसर्गाचा भगवा झेंडा दूरवरून नजरेस पडतोच पडतो!ह्या भगव्या रंगाच्या ज्वाला निश्चितच जगण्याची उभारी देतात,हे नक्की!

हदगांव नगर परिषद हदगांव
०२४६८ ऑफिस २२२४०८
Email-id- cohadgaon@gmail.com स्थापना 1954
ह.न.प.आ.क्र..न.प.आस्थापना / 9789 /2026 दिनांक 27/02/2026

जाहीर ई-निविदा सूचना
सन २०२५-२६

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव जि. नांदेड हे खालील नमूद कामासाठी कामनिहाय शासनाचे योग्य त्या वर्गातून नोंदणीकृत मजेदार/पुरवठादार/कंत्राटदार जे पुर्व अर्हता अटी पुर्ण करतील अशा ठेकेदारांकडुन फक्त ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे. या ई-निविदेच्या पुर्वअर्हता अटी व सविस्तर निविदा सुचना तसेच सदर कामा बाबतचे वेळापत्रक शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल.

| अक्र | कामाचे नाव | निविदा शुल्क | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | हदगाव नगरपरिषद हद्दीतील भटक्या कुत्र्यांची संख्या मर्यादित ठेवणे, रेबीज निर्मुलन करणे, मनुष्य कुत्रा संघर्ष टाळणे ई. बाबींच्या अनुषंगाने भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करून संख्या नियंत्रित करणे. | रु.१,०००/- | रु.५,०००/- | १२ महिने |

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा प्रसिद्ध दिनांक | ०२/०३/२०२६ दुपारी ०२.०० वाजता |
| २. | ई-निविदा प्रपत्र दाखल करणेची अंतिम तारीख | १२/०३/२०२६ दुपारी ०४.०० वाजे पर्यंत |
| ३. | ई-निविदा उघडण्याची तारीख (शक्य झाल्यास) | १३ /०३/२०२६ सं. ०५.०० वाजता (शक्य झाल्यास) |

निविदा बाबत माहिती आणि अटी व शर्ती

संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सुचना, शुध्दीपत्रके इत्यादी माहिती http://www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

मुख्याधिकारी
नगर परिषद हदगाव

CMYK

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दयानंद विज्ञानमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात भाषा विभागाच्या वतीने दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्येष्ठ कविवर्य कुसुमाग्रज ऊर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी कॉलेज,परभणी येथील डॉ.एस.एन.केशेट्टी व ग्रामीण कॉलेज वसंतनगर कोटग्याल,जि.नांदेड येथील डॉ.डी.के.केंद्रे यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्या व मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देताना मराठी भाषेचे जतन व संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी भाषिकांचे आद्य कर्तव्य असून मराठी भाषेची अस्मिता जोपासली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक हेमंत वरुडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, भाषा विभागातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित, हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन बने, मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.महेश बेंबडे, कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.विश्वनाथ मोटे, प्रा.कविता जाधव, डॉ.पांडुरंग गोरे, विठ्ठल चव्हाण, विनोद घार, सतीश तांदळे, किशोर जाधव, सुनील राक्षे, बाबासाहेब बचाटे, सागर इंदाणी, पर्णवी ढवारे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# सांप्रदाय वाढला तरच जग टिकणार

## देशातील सर्वात भव्य संत तुकाराम महाराजांचे मंदिर लातूरात व्हावे: आ. रमेशआप्पा कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** लाखो लोकांना एकत्र आणण्याची खरी ताकद फक्त संताच्या विचारात आणि वाणीत आहे जोपर्यंत सांप्रदाय जिवंत आहे तोपर्यंत सर्व समाज जिवंत असेल सांप्रदाय टिकला तरच जग टिकणार असून देशातील सर्वात भव्य जगद्गुरु तुकाराम महाराजांचे मंदिर लातूरात व्हावे, जिथे संकल्प असतो तिथे कसलीही अडचण येत नाही असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.





श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या वैकुंठगमन, श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी आणि कैवल्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलीच्या ७५० व्या जन्म उत्सव सोहळ्यानिमित्त लातूरनजीक खंडापूर गावाजवळ अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यानिमित्ताने संतांचा मेळा आणि वारकऱ्यांचा कुंभमेळा होत आहे. या अभूतपूर्व सोहळ्यात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड यांनी शनिवारी सहभागी होऊन विविध संतांच्या पादुकाचे भक्तीभावे दर्शन घेतले. हभप गुरुवर्य ज्ञानेश्र्वर माऊली कदम महाराज यांच्या प्रवचनानंतर त्यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

यावेळी शुभेच्छा देताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, खंडापूर परिसरात साधुसंताचा मेळा होतोय या निमित्ताने देहूचे तुकाराम महाराज, आळंदीचे ज्ञानेश्र्वर माऊली आपल्या परिसरात आले त्यांचे दर्शन आणि आशीर्वाद आपल्याला मिळत आहेत. खरोखरच आम्ही सर्वजण नशीबवान आहोत. एवढा मोठा सप्ताह देशात कुठे झाला असेल असे मला वाटत नाही, भविष्यातही अशीच संधी लातूरकरांना मिळावी सेवेसाठी लातूरकर कुठेही कमी पडणार नाही याची मला खात्री आहे. लाखो लोकांना एकत्र आणण्याची खरी ताकद फक्त संताच्या विचारात आणि वाणीत आहे. जोपर्यंत सांप्रदाय जिवंत आहे तोपर्यंत सर्व समाज जिवंत आहे.

सप्ताह परिसरात जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे मंदिर उभारण्याची संकल्पना पुढे आली. हे मंदिर देशातील सर्वात भव्य मंदिर व्हावे जिथे संकल्प सत्य असतो तिथे कुठलीही अडचण येत नाही या मंदिर उभारणी बरोबरच प्रति देहू उभे राहावे अशी इच्छा व्यक्त करून संत महात्मे जे आज्ञा, सूचना, आदेश करतील ती सेवा देण्याचे काम मी आणि माझा परिवार करेल असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, संप्रदाय टिकावा यासाठी मी माझ्या लातूर ग्रामीण मतदार संघातील तब्बल ५५० भजनी मंडळांना भजनाच्या साहित्याचे वाटप केले असल्याचे बोलून दाखवले.

आप्पाचा विषय लय हार्ड आहे त्यांच्याकडे क्रेडिट कार्ड आहे असे बोलून माऊली कदम महाराज यांनी शेवटच्या दिवशी होणाऱ्या पुरणपोळी जेवणाकरिता दुधाची अपेक्षा व्यक्त केली. सर्वांच्या आशीर्वादाने लातूर ग्रामीण मतदार संघाची सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी लागेल तेवढे दूध आणि तूपही देऊ असे जाहीर केले त्याचबरोबर या सप्ताहाच्या नियोजनासाठी अकरा लक्ष रुपयाची यावेळी मदत केली. रस्त्याच्या कडेने फिरून पोट भरणाऱ्या भिकाऱ्याला कोविड झाला नाही मात्र करोडपती, आरोबोपतीचा ऑक्सिजन अभावी मृत्यू झाला हे सत्य आहे. सांप्रदाय टिकला तर जग टिकणार याचा प्रत्यय कोरोना काळात सर्वांना आला असल्याचेही त्यांनी बोलून दाखवले.

यावेळी भाविक भक्त महिला पुरुष प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. आ. कराड यांच्यासमवेत भाजपाचे प्रदीप पाटील खंडापूरकर, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, बन्सी भिसे, उद्धव काळे, सतीश आंबेकर, अनंत चव्हाण, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, शरद दरेकर, साहेबराव मुळे, सुरज शिंदे, दीपक वांगसकर, राजकिरण साठे, ज्ञानोबा भिसे, वसंत करमूडे, अनंत पाटील, मारुती शिंदे, चंद्रकांत कातळे, राम मोरे, रवींद्र नागरगोजे, धनराज शिंदे, संतोष चव्हाण, लक्ष्मण खलंग्रे, किरण मुंडे, प्रशांत शिंदे, अक्षय भोसले, शंकर चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, देवराव मोहिते, बंटी शिंदे, ओम चव्हाण, रवींद्र पाटील, बालाजी गवळी, एम. डी. मुळे, दत्ता सप्ताळ, गोविंद मुंडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी व इतर अनेक जण होते.

## विविध वृत्त...

### सावित्रीबाई फुले आधार व पं. दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी अर्ज करावेत

**लातूर:** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने सन २०२५-२६ साठी सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सरू केलेली आहे. प्रति जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

महसुली विभाग शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ४३ हजार रुपये, जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ३८ हजार रुपये व तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक सलग्न असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. या योजनेतर्गत अर्ज करण्याकरीता विद्यार्थी वसतिगृह प्रवेशास पात्र असावा. विद्यार्थी महाराष्ट्रचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र,तसेच जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहराच्या तथा तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील विद्यार्थी स्थानिक रहिवाशी नसावा. विद्यार्थी बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. तसेच विद्यार्थ्याने इयत्ता बारावीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इतर मागास वर्ग विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले आधार योजना व धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजनेतंर्गत १० मार्च, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने या संकेतस्थळावर https://hmas.mahait.org अर्ज भरावे. अधिक माहितीसाठी निरीक्षक भगवान केंद्रे (मो. न. ९५६११०९०१८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

### जेईई परीक्षेत जिल्ह्यात पहिला आल्याबद्दल सुमित धावणे याचा सत्कार



**लातूर:** जेईई मेन्स परीक्षेत लातूर जिल्ह्यात पहिला आल्याबद्दल सुमित गोविंद धावणे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पाडुरंग देडे, प्रेमाताई देडे यांनी सत्कार केला. सुमित धावणे या विध्यार्थ्याने आंतरभारती, राष्ट्र सेवा दलाची संस्कार शिबीरांत सहभाग घेतलेला आहे. अत्यंत अभ्यासू आणि होतकरू विद्यार्थी आहे. यावेळी सुमितची आई सौ साधना धावणे, इतर विद्यार्थी, पालक उपस्थित होते

## युवकांच्या सहभागातूनच शाश्वत विकास साध्य होईल - डॉ. डोंगरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागामार्फत आयोजित विशेष वार्षिक शिबिर मौजे जमालपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. 'शाश्र्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास' या संकल्पनेवर आधारित हे सात दिवसीय नुकतेच संपन्न झाले.





या शिबिराच्या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बालाजी घार, प्रमुख पाहुणे डॉ. शिवप्रसाद डोंगरे, मंचावर प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, डॉ. संगीता घार, मुख्याध्यापक श्री. नागनाथ कारंडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. रामेश्वर स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शिवप्रसाद डोंगरे म्हणाले की, शाश्र्वत विकास करायचा असेल तर युवकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे युवकांच्या सहभागानेच शाश्र्वत विकास साध्य होईल, विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी अष्टोप्रहर अविरत कार्यरत राहणे काळाची गरज बनत चालले आहे. कारण समाजामध्ये दररोज नित्य नवीन समस्या निर्माण होत आहेत असे मत व्यक्त केले.

यां समारोप समारंभात मार्गदर्शन करताना डॉ. संगीता घार म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी स्वतः आरोग्य आणि शिस्तीचे पालन चांगल्या प्रकारे केल्यामुळेच समाजामध्ये हे विद्यार्थी एक आदर्श विद्यार्थी म्हणून गणले जातील असे मत व्यक्त केले.

या सात दिवसीय शिबिरामध्ये वनराई बंधारे बांधकाम, ओसाड भूमी विकास, परिसर स्वच्छता अभियान, महिला सशक्तिकरण, नशामुक्ती जनजागृती, आरोग्य तपासणी शिबिर, अंधश्रद्धा निर्मूलन, ई-कॉमर्स व डिजिटल मार्केटिंग मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, बालविवाह प्रतिबंध जनजागृती आणि रस्ता सुरक्षा अभियान असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांचे श्रमदान व जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. केशव आलगुले, सूत्रसंचालन प्रा. प्रज्ञा कांबळे, तर आभार डॉ. प्रमोद चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, डॉ. प्रा. शिवराज बाजुळगे,श्री. रामदास जाधव, रासेयो स्वयंसेवक शितल पवार, जयश्री जमादार, शितल गडेराव, लक्ष्मी नाळापुरे, धनुरे प्रेरणा, अमर खुणे, ऋषिकेश कांबळे, सौदागर बिराजदार,हर्ष बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

## दयानंद महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन सोहळा संपन्न!

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** कवी कुसुमाग्रज जयंती अर्थात माय मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालय मराठी विभागाने ग्रंथ प्रदर्शन, व्याख्यान व काव्य संमेलनाचे आयोजन केले होते. या निमित्ताने कवयित्री समिधा कोळगणे यांना आमंत्रित करण्यात आले होते. नवोदित विद्यार्थी वर्गातील कवी कवयित्रींनी बहारदार कवितांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची उंची गाठली. मातृभाषा मराठीचा गुणगौरव करणाऱ्या कवितांबरोबरच मानवी भाव आंदोलने टिपणाऱ्या कवितांचेही सादरीकरण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी मराठी भाषा व्यवहार म्हणजे केवळ व्याकरण शुद्ध बोलणे नव्हे, तर विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट हेतूने आणि विशिष्ट व्यक्तींशी संवाद साधताना भाषेचा प्रभावी वापर करणे होय. जेव्हा आपण भाषा व्यवहारात आणतो, तेव्हा शब्दांच्या अर्थासोबतच संदर्भ, संकेत आणि सामाजिक शिष्टाचार महत्त्वाचे ठरतात. मराठी भाषा व साहित्याचे सामर्थ्य, उपयोग कथन करताना भाषेचा समर्पक वापर अभिव्यक्ती प्रभावी करतो असे मत प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री समिधा कोलगणे यांनी मराठी साहित्य, निर्मितीबाबत आपली भूमिका मांडली. कविता त्यांच्या जीवनप्रवासाच्या साक्षी आहेत असे सांगत कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी साहित्य म्हणजे मनाचा आरसा असतो यावर विवेचन केले.

राठी विभागातील प्राध्यापक डॉ. सुभाष कदम, प्रा. राजू मोरे, प्रा. अंगद भुरे,प्रा. विद्या गिराम, डॉ. सुलक्षणा सरवदे, व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी यांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमात दयानंद कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. काव्य संमेलनात ओमकार सुरवसे, रवी वाघमारे, योगिता गुम्मे, पायल जावळे, देवांश पाचंगे, मधुरा धानोरकर, यश शिंदे, सुजित कांबळे, अनिकेत बिराजदार, महेश कसबे, प्रियंका कांबळे, पायल माने, अंजली बनसोडे, भाग्यश्री ढोणे, निकिता कांबळे, ऋचा कुलकर्णी, पंकज स्वामी इत्यादी कवी-कवियत्रींनी आपल्या काव्यवाचनाद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. माय मराठीचा काव्यात्मतेचा प्रत्यय, तिच्यातील मधूर गोडवा अभिरुची संपन्न मनात कायम राहील असा घडला.

### राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शनिवारी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते थोर शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांनी रमन इफेक्टचा शोध लावला. या कामगिरीचा गौरव करण्यासाठी आणि वैज्ञानिक जागरूकता वाढवण्यासाठी, भारत सरकारने १९८६ मध्ये २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून घोषित केला. त्यामुळे आपण विज्ञान दिवस साजरा करतो. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरून भारताला प्रगतीपथावर न्यावे, असे आवाहन त्यांनी केले.विज्ञान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात माय मराठीचा जागर!

## ➤ मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज- ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते

## ➤ मातृभाषेच्या सन्मानासाठी सर्वजण पुढाकार घेऊया- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** ज्यांच्यावर आपल्या मातृभाषेचा खोल प्रभाव आहे, असे लोक यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे आपली मुले व नातवंडे यांना मातृभाषेतील शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते यांनी केले. तसेच दैनंदिन जीवनात मराठीचा वापर करून आपल्या मातृभाषेच्या सन्मानासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.









जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ ग्रामीण कथाकार प्रा. सुरेंद्र पाटील, ज्येष्ठ साहित्यिक तथा ग्रामीण कृषी शब्दांचे अभ्यासक प्रा. द. मा. माने, ज्येष्ठ साहित्यिक-कवयित्री तथा बालकथाकार श्रीमती वृषाली पाटील, ज्येष्ठ कथाकार जी. जी. कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मराठी भाषेत अद्वितीय साहित्यनिर्मिती झाली आहे. साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली आहे आणि वैश्विक पातळीवरही तिचा गौरव वाढवला आहे. मात्र सद्य:स्थितीत साहित्यनिर्मिती विखुरलेल्या स्वरूपात होत असल्याचे डॉ. शेषराव मोहिते यांनी नमूद केले. तसेच ग्रामीण साहित्याची समृद्ध परंपरा यावेळी त्यांनी सांगितली.

प्रत्येक जिल्ह्याची ओळख त्याच्या सांस्कृतिक वैभवावर आणि साहित्य संपदेवरून होते. आपल्या आयुष्याच्या जडणघडणीत मराठी भाषेचा खूप मोठा वाटा आहे. मराठी भाषेची अस्मिता, आपली मायबोली प्रत्येकापर्यंत पोहोचवून आपण तिचा सन्मान करूया, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

ज्येष्ठ ग्रामीण कथाकार प्रा. सुरेंद्र पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मराठी भाषेचा लौकिक साहित्यिकांनी वाढविला आहे. आपण सर्वजण मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहाने साजरा करतो, परंतु मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल, तर लग्नसमारंभ, सोहळे व इतर कार्यक्रमांत मराठी पुस्तके नातेवाईक, मित्रांना भेट देण्याचा संकल्प करावा. मराठी साहित्याचे गंभीरतेने वाचन करूया, मराठीत बोलूया, मराठी भाषेचे संवर्धन करूया आणि लातूरची मराठी भाषा व संस्कृती जपूया, असे त्यांनी आवाहन केले.

ज्येष्ठ साहित्यिक तथा ग्रामीण कृषी शब्दांचे अभ्यासक प्रा. द. मा. माने यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आज कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आहे. मराठी भाषा टिकली पाहिजे, तिचे संवर्धन झाले पाहिजे आणि मराठी शाळा वाढल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. कृषी विषयातील अनेक मराठी शब्द हरवले आहेत; त्यांना पुन्हा जवळ करावे. मराठीतच संवाद साधावा आणि मराठी भाषेचे संवर्धन करावे, असे त्यांनी सांगितले.

श्रीमती वृषाली पाटील यांनी फुंकर ही मराठी कविता सादर केली. ज्येष्ठ कथाकार जी. जी. कांबळे यांनी घर असावे घरासारखे, नकोत भिती असे सांगून मुलांमध्ये लहानपणापासूनच लेखनाची आवड निर्माण करावी, असे सांगितले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रभाकर कापसे यांचा पुस्तक भेट देऊन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**जिल्हाधिकारी कार्यालयात अभ्यागतांसाठी ग्रंथदालन**

जिल्हाधिकारी कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील अभ्यागत कक्षात मराठी ग्रंथालय दालन तयार करण्यात आले असून, त्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, गणेश पवार, सायली ठाकूर, तहसीलदार संदीप कुलकर्णी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमातून मराठी भाषेचे संवर्धन, वाचन संस्कृती रुजवणे आणि मायबोलीचा गौरव करण्याचा संदेश देण्यात आला. जिल्हा ग्रंथालय संघ लातूर व जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील मराठी ग्रंथालय दालनासाठी ५०० ग्रंथ भेट देण्यात आले.